दैनिक
www. sahyandrinews.com
# सह्याद्रीचा राखणदार
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • अंक १२ • RNI : MAHMAR/2023/87818 • गुरुवार दि.३१ ऑक्टोबर २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Agro. Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क

## २०२४ मध्ये भाजपचा,२०२९ ला मनसेचा मुख्यमंत्री

# राज ठाकरेंच्या दाव्याने राजकीय वर्तुळात खळबळ

# देवेंद्र फडणवीस पुन्हा मुख्यमंत्री होणार का?

**मुंबई (वृत्तसंस्था)मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आपल्या विधानाने मतमोजणी पूर्ण होण्याआधीच एकाप्रकारे निवडणुकीचा निकाल जाहीर केला आहे. २०२४ मध्ये भाजपचा मुख्यमंत्री होणार असून हा आपला अंदाज असल्याचे ही त्यांनी म्हटले आहे. २०२४ मध्ये मुख्यमंत्री भाजपचाच होईल, तर २०२९ मध्ये मुख्यमंत्री हा मनसेचा असेल, असा दावाही राज ठाकरे यांनी व्यक्त केले. त्यांच्या या विधानामुळे सर्वांच्याच भुवया उंचावल्या असून राजकीय वर्तुळात चर्चा होत आहे.मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आगामी विधानसभा निवडणूक स्वबळावर लढवण्याचा निर्णय घेतला आहे. आतापर्यंत त्यांनी १०० हून अधिक उमेदवारांची घोषणा केली आहे. राज ठाकरे यांनी चिरंजीव अमित ठाकरे यांना माहीममधून विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरवले आहे. दरम्यान, काही मतदारसंघांमध्ये मनसे आणि महायुतीची मैत्रीपूर्ण लढत होणार असल्याची चर्चा आहे.**



यंदाची निवडणूक रंजक होणार असून सर्वांना निकालाची उत्सुकता आहे. त्यातच, राज ठाकरे यांनी एका वृत्तवाहिनीच्या कार्यक्रमात बोलताना २०२४ चा मुख्यमंत्री हा भाजपचाच होईल, तर २०२९ चा मुख्यमंत्री मनसेचा असेल, असे भाकीत केले. यामुळे राज ठाकरेंनी एकप्रकारे देवेंद्र फडणवीस यांना पुन्हा मुख्यमंत्रीपद मिळण्याची शक्यता असल्याचे सूचक विधान केले आहे. तसेच, मनसेच्या पाठिंब्यावरच हा भाजपचा मुख्यमंत्री होईल, असेही राज ठाकरे म्हणाले. राज ठाकरे यांनी २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत आदित्य ठाकरे यांच्याविरोधात वरळीमध्ये मनसेचा उमेदवार उभा केला नव्हता. मात्र, २०२४ निवडणुकीत उद्धव ठाकरे यांनी माहीम मतदारसंघात पुतण्या अमित ठाकरे विराधोत उमेदवार दिला आहे. यावर बोलताना राज ठाकरे म्हणाले. आदित्य ठाकरेंसाठी मी विचार केला. विरोधातील पक्ष असला तरी मी राजकारण आणि नातेसंबंध जपत असतो. राजकारणाशी कौटुंबिक संबंध ठेवण्याची प्रेरणा बाळासाहेब ठाकरे यांच्याकडून मिळाली.आदित्य ठाकरे निवडणूक लढतोय, म्हणून आपण उमेदवार नको देऊया, असे मला वाटले. मला त्याचा पश्चाताप नाही. समोरचा तसा विचार करेलच अशी अपेक्षा नाही. प्रत्येकजण आपल्या स्वभावानूसार वागत असतो. भाजपला ही गोष्ट कळू शकते, सगळ्यांनाच हे कळेल असे नाही. प्रत्येकाचे ओरबाडण्याचे प्रयत्न सुरु असतात, असे म्हणत राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरेंवर निशाणा साधला.

## पुण्यात गोळीबाराच्या घटना थांबता थांबेना

# वडगाव धायरी परिसरातील हॉटेलसमोर तरुणावर फायरिंग

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहरातून मोठी बातमी समोर आली आहे. पुण्यात पुन्हा एकदा गोळीबाराची घटना घडली आहे. ऐन दिवाळीत गोळीबाराची घटना घडली आहे. पुण्यातील अलंकार पोलीस स्टेशनच्या हद्दीत ही घटना घडली आहे. या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. या घटनेनंतर पोलीस घटनास्थळी पोहोचले आहेत.



मिळालेल्या माहितीनुसार, पुण्यात ऐन दिवाळीत गोळीबाराची घटना घडली आहे. पुण्यातील अलंकार पोलीस स्टेशनच्या हद्दीत गोळीबाराची घटना घडली आहे. या घटनेनंतर पोलीस घटनास्थळी पोहोचले आहेत. पुण्यात तीन जणांकडून गोळीबार झाल्याची घटना समोर आली आहे. ऐन निवडणूक आणि सणासुदीत घटना घडल्याने खळबळ उडाली आहे.

राज्यात सर्वत्र निवडणुकीची धामधूम सुरू झाली आहे. सर्व राजकीय पक्षांनी प्रचाराचा धडाका लावला आहे. पुण्यातही निवडणुकीची रणधुमाळी पाहायला मिळत आहे. या निवडणुकीसाठी पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला आहे. याचदरम्यान, पुण्यात गोळीबाराची घटना घडल्याने खळबळ उडाली आहे. पुण्यात रात्री अंधारात तिघांनी गोळीबार केला आहे.

गेल्या काही महिन्यांपासून पुण्यात सातत्याने अशा घटना घडत असल्याने संताप व्यक्त करण्यात येत असतानाच गोळीबाराच्या घटना वाढताना दिसत आहेत. पुण्यातील वडगाव धायरी परिसरातील सृष्टी गार्डन हॉटेलसमोर गोळीबार करण्यात आला आहे. वेदांत भोसले नावाच्या तरुणावर गोळीबार करण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र गोळी वेदांतच्या बोटाला स्पर्श करून गेल्याने त्याला इजा झाली नाही. हा गोळीबार कोणी केला याचा तपास पोलिसांकडून सुरू करण्यात आला आहे.

## आरोपांची फाईल दाखवणे हे गोपनीयतेचे भंग:आर.आर. पटलांवरील आरोपांवर जयंत पाटलांचा हल्लाबोल

**मुंबई (वृत्तसंस्था)**–माजी गृहमंत्री स्व. आर. आर. पाटील यांच्याबाबतीत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वादग्रस्त विधान केले आहे. यामुळे राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. आर. आर. पाटील यांनी ७० हजार कोटीच्या सिंचन घोटाळ्याच्या चौकशीच्या फाईलवर सही केली होती, असा गौप्यस्फोट अजित पवार यांनी केला होता. तसेच ती फाईल देखील त्यांनी दाखवली होती. यावर महाविकास आघाडीमधील नेत्यांकडून संतप्त प्रतिक्रिया येताना दिसत आहेत.

शरद पवार गटाचे नेते व प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील म्हणाले, ज्यांच्यावर आरोप आहेत त्यांनाच ती फाईल घेऊन दाखवणे हे गोपनीयतेचा भंग आहे. आज दुर्दैवाने आर. आर. पाटील हयात नाहीत, ते हयात असते तर त्यांनी याचे उत्तर दिले असते. तेव्हा काय परिस्थिती होती, आम्हाला काही सांगता येत नाही. पण एखादा व्यक्ती हयात नसताना त्यावर त्यावर बोलणे आणि कॉमेंट करणे हे आपण शक्यतो कधी करत नाहीत, टाळतो. पण त्यांनी तासगावात येऊन असे भाष्य करणे, तासगावातलेच नाही तर महाराष्ट्रातील अनेक लोक आर आर पाटील यांना मानत होते अजूनही मानतात. डान्सबार बंदीपासून अनेक अतिशय आदर्श उपक्रम त्यांनी महाराष्ट्रात राबवले आहेत. देवेंद्र फडणवीस तीच फाईल ज्यांच्यावर आरोप आहेत त्यांनाच दाखवतात, हे आश्चर्य आहे.यावर संजय राऊत यांनी देखील प्रतिक्रिया दिली आहे. अजित पवार म्हणाले होते की आर. आर. पाटलांनी केसाने गळा कापण्याचा प्रयत्न केला होता. यावर संजय राऊत म्हणाले, आबांचे केस लहान होते. ते कसाने गळा कापू शकत नाही. ते प्रामाणिक, कर्तबगार गृहमंत्री होते. त्यांनी गृहमंत्री म्हणून कधी चुकीच काम केले नाही, अशी प्रतिक्रिया संजय राऊत यांनी दिली आहे. तसेच अजित पवार व देवेंद्र फडणवीस यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची देखील त्यांनी मागणी केली आहे.शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी देखील संतप्त प्रतिक्रिया दिली आहे. सुप्रिया सुळे म्हणाल्या, घोटाळ्याचे आरोप फडणवीसांनीच केले.

## भाईंदर,वसईतील ३६ पोलीस अधिकारी बदलले, १९ पोलीस ठाण्यांतील १५ वरिष्ठ पोलीस निरीक्षकांची बदली



**वसई । मनोज उतेकर**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने मुंबई, नवी मुंबई आणि मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयातील २२२ पोलीस अधिकार्यांच्या बदल्यांचे आदेश बुधवारी दुपारी काढले. यामध्ये मुंबईतील १७३, नवी मुंबईतील १९, तर मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयातील ३६ पोलीस अधिकार्यांचा समावेश आहे.

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने केंद्रीय निवडणूक आयोगाने पोलीस महासंचालकांना बदल्यांबाबत निर्देश दिले होते. त्यानुसार, एकाच आयुक्तालयात दोन जिल्हे असतील आणि त्यातील ज्या पोलीस अधिकार्यांना ३ वर्षे पूर्ण झाली असतील, अशा पोलिसांची बदली करण्याचे निर्देश दिले होते. मुंबई, नवी मुंबई आणि मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयात दोन जिल्हे येतात. त्यामुळे या पोलीस आयुक्तालयातील ३ वर्षे पूर्ण झालेल्या पोलिसांची यादी पोलीस आयुक्तांनी मागवली होती. बुधवारी दुपारी विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापन) के. एम. प्रसन्ना यांनी बदल्यांचे आदेश काढले, ज्यात मुंबईतील १७३, मिरा भाईंदर वसई विरारमधील ३६, आणि नवी मुंबईतील १९ पोलीस अधिकारी बदलण्यात आले आहेत.

**१९ पोलीस ठाण्यातील १५ प्रमुखांच्या बदल्या**

मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयातील ३६ पोलीस अधिकारी मुंबईत बदली करण्यात आले आहेत. आयुक्तालयात एकूण १९ पोलीस ठाणी असून, त्यापैकी १५ पोलीस ठाण्यांचे प्रमुख बदलण्यात आले आहेत. या बदल्यात संजय हजारे (मांडवी), जितेंद्र वनकोटी (पेल्हार), राजू माने (माणिकपूर), रमेश भामे (नायगाव), विलास सुपे (नया नगर), राहुल पाटील (काशिगाव), चंद्रकांत सरोदे (मिरा रोड), प्रफुल्ल वाघ (भाईंदर), विजय पवार (विरार), रणजीत आंधळे (वसई), राजेंद्र कांबळे (काशिमिरा), बाळासाहेब पवार (आचोळे), सदाशिव निकम (नालासोपारा), जयराव रणावरे (वालीव) आणि शैलेंद्र नगरकर (तुळींज) या वरिष्ठ पोलीस निरीक्षकांचा समावेश आहे.

# श्रीरामपूरमधून गावठी पिस्तूल बाळगणारा गजाआड

**श्रीरामपूर । शहाजी सुखदेव दिघे**

श्रीरामपूर शहरामध्ये गावठी पिस्तूल बाळगणाऱ्या व्यक्तीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने काल (ता. २९) जेरबंद केले आहे. इम्तियाज अजीज शहा (वय ३२, रा. काझीबाबा रस्ता, श्रीरामपूर) असे जेरबंद आरोपीचे नाव आहे. त्याच्याकडून पथकाने एक गावठी पिस्तूल व दोन जिवंत काडतुसे हस्तगत केली आहेत.




विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश जिल्हा पोलीस प्रशासनाला दिले होते. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पथक माहिती काढत होते. श्रीरामपूर येथील दत्तनगर परिसरातील सुतगिरणी फाटा येथे एक व्यक्ती संशयास्पद स्थितीत आढळून आला. त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याकडे एक गावठी पिस्तूल व दोन जिवंत काडतुसे असा ३१ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला.

पथकाने आरोपीविरुद्ध श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात अवैध शस्त्र बाळगल्याचा गुन्हा दाखल केला आहे. पथकाने पुढील तपासासाठी आरोपीला श्रीरामपूर शहर पोलिसांच्या ताब्यात दिले आहे.

## उमेदवार, पक्षांसाठी निवडणुकीबाबतच्या परवानग्या ऑनलाईन मिळण्यासाठी 'सुविधा २.०' मोबाईल ॲप

**रायगडे । प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाने 'सुविधा २.०' हे मोबाईल ॲप अद्ययावत केले असून याद्वारे उमेदवार आणि पक्षांना आता कोणत्याही ठिकाणाहून सहजपणे निवडणूक मोहिमेच्या परवानग्या ऑनलाईन सुविधेद्वारे मिळणार आहेत.

यापूर्वी फक्त ऑनलाईन पोर्टलवरच अर्ज सादर करता येत होते, पण आता नवीन ॲपद्वारे सर्व प्रक्रिया मोबाईलवरून करता येणार असल्याचे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने कळविले आहे.

सुविधा २.० हे मोबाईल प वापरण्यास सहज आणि अधिक सुरक्षित आहे. या ॲपच्या खास वैशिष्ट्यांमध्ये उमेदवारांना अर्ज डाउनलोड करणे, प्रचारासंदर्भातील परवानग्या मागवणे, अर्ज केलेल्या परवानगी संदर्भात सद्यस्थिती जाणून घेणे आणि मंजुरीची प्रत डाउनलोड करणे आदी बाबी समाविष्ट आहेत. या ॲपमध्ये नामनिर्देशन प्रक्रिया, निवडणूक वेळापत्रक आणि निवडणूक आयोगाच्या ताज्या अद्ययावत सूचना व आदेश देखील उपलब्ध असतील.हे ॲप अँड्रॉइडसाठी गुगल प्ले स्टोरवर https:// play. google.com/ store/apps/details... यावर आणि आयओएससाठी पल प स्टोरवर https:// apps.apple. com/app/ suvidha- candidate/ id6449588487 या लिंकवर उपलब्ध



# मतदार यादीतून नावे गायब!

**मतदानाच्या दिवशी मतदार यादीत नांव नसले म्हणजे गोंधळून जाऊन भ्रमनिरास झालेले मतदार प्रशासनाकडे बोट दाखवीत आपल्या बेजबाबदार वागण्याकडे दुर्लक्ष करीत असतात. खरे म्हणजे प्रशासन जेव्हा नागरिकांना मतदार नोंदणीसाठी आवाहन करते. तेव्हा जबाबदार नागरिक म्हणून त्या मतदार यादीत आपले आहे की नाही याची खातरजमा करून घेतली पाहिजे. नसेल तर नांव समाविष्ट करून घेणे हे प्रत्येक नागरिकाचे आद्य कर्तव्य आहे. नागरिकांनी थोडे सतर्क राहून आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडले तर प्रत्येकाला मतदानाचा अधिकार प्रामाणिकपणे बजावता येईल. कोणीही नागरिक मतदानापासून वंचित राहणार नाही. परिणामत: प्रत्येकाला आपल्या आवडीचे सरकार निवडता येईल.**

निवडणुका हा लोकशाहीतील मोठा उत्सव असतो. सार्वजनिक उत्सवात ज्याप्रमाणे अनेक मंडळी आनंदाने नाचतात, बागडतात व उत्साहाने सहभागी होऊन आपला आनंद व्यक्त करतात. तसेच निवडणुकांचेही आहे. या उत्सवात लोकशाहीशी संबंधित प्रत्येक घटक आपली आपली कर्तव्ये पार पाडीत असतात. प्रत्येकजण आपापली भूमिका योग्य रीतीने पार पाडतो. समजण्यासाठी एक उदाहरण समजून घेऊया. उदाहरणार्थ जशी उत्सवाच्या ठिकाणी वेगवेगळी अनेकानेक प्रकारची दुकाने लागतात. तसेच वेगवेगळ्या प्रकारचे गिऱ्हाईके पण असतात. दुकानदाराचे काम असते योग्य भावाप्रमाणे मालाची विक्री करणे. गिऱ्हाईकाचे काम आहे त्याला पटेल त्या भावात खरेदी करणे. सांगायचे तात्पर्य असे की यात दोघेही आपापली कर्तव्ये प्रामाणिकपणे पार पाडतात म्हणून व्यवहार सुरळीत चालतो. निवडणुक कोणतीही असो.निवडणुका सुरळीत पार पडण्यासाठी मतदार आणि प्रशासन यांनी आपापली भूमिका योग्य पद्धतीने पार पाडली पाहिजे. निवडणुका हा सुध्दा एकप्रकारे सार्वजनिक उत्सव आहे. या उत्सवात एक जबाबदार नागरिक म्हणून सहभागी होणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. निवडणुका आल्या की प्रशासन आपले कर्तव्ये पार पाडत असतात. परंतु प्रशासनाच्या आवाहनाला साथ देत एक नागरिक म्हणून आपणही आपली भूमिका योग्य रीतीने पार पाडली पाहिजे. हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्ये आहे. परंतु दुर्दैवाने नागरिकांना जसे आपले अधिकार माहिती असतात तसे कर्तव्ये माहिती नसते.

निवडणुकांच्या निमित्ताने नेहमी चर्चिला जाणारा प्रश्न म्हणजे निवडणूक यादीतून मतदारांची नावे गायब होणे. मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावर गेल्यानंतर मतदारांना यादीत नावे दिसली नाही की गोंधळून जातात. मतदान केंद्रावर आकांडतांडव करतात. नको तसा गोंधळ घालतात.अनेकजण प्रशासनावर आरोपही करतात. प्रशासनाने हेतूपुरस्पर आमची नावे गायब केलेली आहे. डोळे फाटेस्तोवर यादीत नावे शोधण्याचा प्रयत्न केला जातो. यादीत नाव दिसले नाही की हिरमुसले होऊन आल्या पावली परत फिरतात. नांव नसल्याने अनेक नागरिकांना आपला मतदानाचा हक्क बजावता येत नाही. आपले राष्ट्रीय कर्तव्ये पार पाडता येत नाही. सरकार निवडण्याच्या प्रक्रियेत सहभागी होता येत नाही. एक जबाबदार नागरिक म्हणून त्याला त्याच्या मतदानाच्या अधिकारापासून वंचित राहावे लागते. खरे म्हणजे मतदारांना त्यांच्या मतदानाच्या राष्ट्रीय कर्तव्यापासून वंचित का राहावे लागते? याला जबाबदार जर कोणी असेल तर स्वतः मतदारच आहे. कारण निवडणुकांचा कार्यक्रम घोषित झाला की प्रशासन वेगवेगळ्या टप्प्यांमध्ये वेगवेगळ्या गोष्टी पार पाडत असतात. या टप्प्यातील एक भाग म्हणजे मतदारांच्या नावांची नोंदणी करणे. वेगवेगळ्या प्रकारचे फार्म भरून तालुका व जिल्हा प्रशासनातर्फे मतदार यादीत नाव नोंदवण्याची संधी उपलब्ध करून दिली जाते. हेतू हाच की मतदारांना मतदानाच्या कर्तव्यापासून दूर राहू न देणे. परंतु प्रशासनाच्या आवाहनाला नागरिक किती प्रमाणात प्रतिसाद देतात हाही चिंतनाचा विषय आहे. जेव्हा नांव नोंदणी करण्याची संधी असते. जेव्हा मतदार यादीत नांव नोंदविण्यासाठी प्रशासन नागरिकांना आवाहन करते. तेव्हा अनेक नागरिक प्रशासनाच्या या सूचनेकडे ढुंकूनही पाहत नाही. खरे म्हणजे प्रशासनाच्या आवाहनाला




प्रतिसाद देत प्रत्येक नागरिकाने जिल्हा कार्यालय व तहसील कार्यालयात जाऊन तिथे उपलब्ध असलेल्या मतदार यादीत आपले नांव आलेले आहे की नाही हे पाहणे

एक जागरूक मतदार म्हणून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. परंतु अनेक लोक त्यातील गांभीर्य समजून घेत नाही. अनेकजण वेळ मिळत नसल्याचे कारण सांगत त्याकडे दुर्लक्ष करतात. जर प्रत्येकाने उपलब्ध कालावधीमध्ये मतदार यादीत आपले नांव तपासले पाहिजे. यादीत नांव नसेल तर योग्य कालावधीत नवीन फॉर्म भरून नांव यादीत नव्याने समाविष्ट करता येते. परंतु अनेकजण याप्रसंगी निष्काळीपणाने वागतात. आपले नांव आहे वा नाही आहे याची कुठलीही खातरजमा न करता प्रशासनाच्या या आवाहनाकडे दुर्लक्ष करतात. ऐन मतदानाच्या दिवशी वेळेवर मतदान केंद्रावर पोहोचून आपले नांव शोधण्याचा प्रयत्न करतात. त्या यादीत नांव नसेल तर अशावेळी मतदारांचा मोठा गोंधळ उडतो. मतदानापासून वंचित राहतात. ज्या हौसेने आणि उत्साहाने ते घरून मतदान करण्यासाठी निघाले ती हौस आणि उत्साह त्याच जागेवर मावळतो. आणि मग प्रशासनाच्या नावाने खडे फोडले जातात. प्रशासनाने नांवे गायब केल्याचा आरोपही केला जातो. अनेकदा प्रशासनावरही वेगवेगळे आरोप करीत स्वतःचा निष्काळजीपणा लपवला जातो. कधी अपवादात्मक प्रसंगी असे होत असेलही. परंतु प्रत्येक वेळेस प्रशासनाकडे बोट दाखवून आपण नामानिराळे राहणे हे बरोबर नाही. जबाबदार नागरिक म्हणून नागरिकांनीही कसेही वागणे अपेक्षित नाही. निवडणुकीपूर्वीच प्रत्येकाने आपल्या नावाची खातरजमा करून घ्यावी. यादीत नांव नसेल तर ते नोंदवून घेणे हा त्यावर उपाय आहे.दुसरे म्हणजे निवडणुका आल्या की अनेक हौसी उमेदवार निवडणुकीत उभे राहतात. आपण जनतेचे कैवारी आहोत असे भासवतात. विविध उपक्रमांच्या माध्यमातून जनतेवरील प्रेम व्यक्त करतात. निवडणूका झाल्या की पुन्हा पाच वर्षे गायब होतात. आता नेत्यांनाही जर निवडणूक लढवायची आहे तर ते जसे निवडणूका पाहून विविध उपक्रम राबवतात तसेच मतदार यादीत नांव नोंदविण्याचा उपक्रम जर त्यांनी प्राधान्याने राबविला तर कुणालाही मतदानापासून वंचित राहावे लागणार नाही. परंतु अनेक इच्छुक उमेदवार त्यांना निवडणुकीत उभे राहायचे आहे हे माहीत असून सुद्धा मतदारांच्या नाव नोंदणीच्या उपक्रमाकडे दुर्लक्ष करतात. याला जबाबदार नागरिक तर आहेच. परंतु निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक असणारे उमेदवारही तेवढ्याच प्रमाणामध्ये जबाबदार आहेत .अनेक उमेदवारांना आपले मतदार कोण आहेत हे माहिती असते. त्यांनी जर आपल्या ओळखीच्या नागरिकांची नांवे मतदार यादीत आहे किंवा नाही याची खात्री करून घेतली. ज्यांची नावे आलेली नसतील त्यांची नांवे समाविष्ट करण्यासाठी प्रोत्साहन दिले. तांत्रिक मदत केली तर कोणीही मतदार मतदानाच्या पवित्र कार्यापासून वंचित राहणार नाही. परंतु सांगणार कोण? शेवटी ही जबाबदारी सामान्य नागरिक प्रशासनाच्या माथी मारून मोकळे होतात.आपले हात झटकून प्रशासनाला अपराधी ठरवतात. परंतु हे विसरतात की याला जेवढे प्रशासन जबाबदार असेल त्यापेक्षा जास्त प्रमाणात आपणह जबाबदार आहोत. उभयतांनी प्रामाणिकपणे आपापली जबाबदारी पार पाडली तर मतदानासारख्या पवित्र कार्यापासून कोणीही वंचित राहणार नाही. सगळ्याला मतदानाचा अधिकार मिळेल. आपल्या आवडीचे सरकार निवडता येईल. सरकार म्हणजे केवळ लोकप्रतिनिधीच नाही तर हे चांगले लोकप्रतिनिधी निवडण्यासाठी सगळ्यांनी केलेले प्रामाणिक प्रयत्न होय.

# आधार माणुसकी तर्फे वंचितांची दिवाळी होणार गोड


## फराळाची तयारी पूर्ण, गुरुवारी ५०० कुटुंबांना होणार वाटप

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

सर्वसामान्यांसोबत वंचित घटकांचीही दिवाळी गोड झाली पाहिजे, या उद्देशाने येथील आधार माणुसकीचा उपक्रमातील ५०० कुटुंबांना दिवाळीचा फराळ देण्याची तयारी पूर्ण झाली आहे. दि.३१ ऑक्टोबर गुरुवार रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत हा दिवाळीचा फराळ वाटप केला जाणार असल्याची माहिती ड. संतोष पवार यांनी दिली.

बीड, लातूर जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त कुंटूबांना शैक्षणिक, आरोग्य विषयक आधार देण्याचे काम संत गाडगेबाबा सेवाभावी संस्थांतर्गत आधार माणुसकीचा उपक्रमांतर्गत केले जाते. त्यांचा दिवाळीचा सणही उत्साहात साजरा होण्यासाठी या कुटुंबांना दरवर्षी फराळ दिला जातो. यात कोरोनाग्रस्त, एड्स बाधीत कुटुंबाचाही समावेश असतो.





या ५०० कुटुंबाना फराळ देण्यासाठी मागील तीन दिवसापासून तयारी सुरू होती. मंगळवारी या फराळाची पॅकिंग पूर्ण झाली. यासाठी श्रीपतरायवाडी येथील बचत गटाच्या महिलांनी पुढाकार घेतला. गुरुवारी येथील बीड रोडवरील सायली मंगल कार्यालयात या फराळाचे वाटप होणार आहे. या कार्यक्रमास युवा वक्ते अविनाश भारती यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. लातूरच्या आर. सी. सी. क्लासेसच्या संचालिका मिनल शिवराज मोटेगावकर, उद्योजक दुर्गा तुकाराम पाटील, प्राचार्या अखिला सय्यद गौस, प्रा. डॉ. सुवर्णा विष्णु तायडे, स्त्रीरोग तज्ज्ञ रेखा प्रल्हाद गुरव, वर्षा जगजित शिंदे, उद्योजक रक्षा धनराज सोळंकी, पोदार स्कूलच्या सचिव सावली मनोज गित्ते, प्रियदर्शनी अभ्यासिकेच्या संचालक ज्योती अभिजित गाठाळ, कल्पना अमृत देशपांडे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन आधार माणुसकीच्या उपक्रमाचे प्रमुख ड. संतोष पवार यांनी केले आहे.

# मार्क्सवादी काम्युनिस्ट पक्ष शाखा सिरसाळा शहराच्या सचिव पदी कॉ. प्रकाश उजगरे यांची बहुमताने निवड



**सिरसाळा । प्रतिनिधी**

दि. २९ अक्टोंबर २०२४ रोजी सिरसाळा या ठिकाणी पक्ष शाखेचे ५ वे शाखा अधिवेशन सपन्न झाले, या अधिवेशनात मागील तीन वर्षाचा अहवाल सचिव या नात्याने कॉ. प्रकाश उजगरे यांनी मांडला एकदरीत या अधिवेशनात राजकीय, शेतकरी, कामगार, विद्यार्थी, महिला यांच्या प्रश्नावर सखोल अशी चर्चा करण्यायत आली. अतिक्रमण व भोगवटा धारक लोकांचा प्रश्न तहसील, जिल्हाधिकारी व आयुक्त कार्यालयापर्यंत सिरसाळा शाखेचा पाठपुरावा चालू आहे असे अनेक प्रश्न सिरसाळा शाखा सोडविण्यासाठी पुढाकार घेत असते. या अधिवेशनाचे अध्यक्ष कॉ. भगवान बडे सर आणि मार्गदर्शक म्हणून कॉ. गंगाधर पोटभरे हे होते. अधिवेशनास पक्ष सभासद, सहायक, उमेदवार मोठया संख्येने उपस्थित होते, यांच्या बहुमताने कॉ. प्रकाश उजगरे यांची सचिव पदी निवड करण्यात आली. या प्रसंगी कॉ. बाबा शेरकर, कॉ.पंडित शिंदे, कॉ. मुक्तेश्वर कढबाने,बाळासाहेब कढबाने, कॉ.मदन राठोड, कॉ.रुस्तुम माने,कॉ. देविदास कांबळे,यशवंत उजगरे व इतर कार्यकर्ते उपस्थित होते आभार कॉ. मदन वाघमारे यांनी मांडले व सर्वांनी शाखा सचिवास पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

# सोलापूर बाजारात कांदा दरात मोठी घसरण; शेतकऱ्यांमध्ये चिंता वाढली

**मोहोळ । प्रतिनिधी**

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत मागील आठवड्यात २५०० रुपये प्रति क्विंटल भाव असणारा कांदा मंगळवारी तब्बल १५०० रुपये प्रति क्विंटल दराने विकला गेला, ज्यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांमध्ये अस्वस्थता पसरली आहे. बाजार समितीच्या माहितीनुसार, मंगळवारी तब्बल ७८० गाड्यांची कांद्याची आवक झाली होती. या कांद्याला १५०० ते ४००० रुपये प्रति क्विंटलचा सरासरी दर मिळाला.

सोलापूर जिल्ह्यात अंदाजे ३२ हजार हेक्टरवर कांद्याची लागवड आहे, तसेच शेजारील जिल्ह्यांमध्ये आणि कर्नाटकातही मोठ्या प्रमाणात कांदा लागवड होत असल्याने आवक वाढली आहे. पावसाळ्याच्या सुरुवातीला कांदा लागवड केलेल्या शेतकऱ्यांच्या कांद्यावर सततच्या पावसामुळे नकारात्मक परिणाम झाला असून, उशिरा काढलेल्या कांद्याचा रंग काळपट पडल्यामुळे तो फक्त २०० ते १२०० रुपये प्रति क्विंटल दराने विकला जात आहे. सप्टेंबरमध्ये लावलेला कांदा नोव्हेंबरअखेर बाजारात येणार असल्याने आवक आणखी वाढण्याची शक्यता आहे, ज्यामुळे दरांत आणखी घसरण होऊ शकते.कांद्याचे दर कमी झाल्याने आणि रोख रक्कमेत मर्यादा आल्याने शेतकऱ्यांसमोर आर्थिक अडचणी उभ्या राहिल्या असून, बाजारपेठेतील परिस्थिती सुधारण्यासाठी शासनाच्या त्वरित हस्तक्षेपाची आवश्यकता आहे.



### रोख रकमेची समस्या; फक्त २० हजारच मिळतात रोखीने

**सोलापूर बाजार समितीत कांदा विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांना फक्त २० हजार रुपयेच रोख दिले जातात, जरी विक्रीचे बिल लाखोंमध्ये असले तरी. उर्वरित रक्कम पंधरा ते वीस दिवसांच्या मुदतीचे चेकद्वारे देण्यात येते. व्यापाऱ्यांकडून पणन कायद्यातील नियमांचे उल्लंघन होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये असंतोषाची भावना निर्माण झाली आहे.**

# निवडणूक निरीक्षकांची बल्लारपूर विधानसभा मतदारसंघाला भेट

## स्ट्राँग रूमची पाहणी व निवडणूक विषयक बाबींचा आढावा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाने नियुक्त केलेले सामान्य निवडणूक निरीक्षक संगीता सिंग, कायदा व सुव्यवस्था निरीक्षक अवधेश पाठक आणि खर्च पथक निरीक्षक आदित्य बी. यांनी ७२ – बल्लारपूर विधानसभा मतदासंघाला एकत्रित भेट देऊन निवडणूक व्यवस्थेचा आढावा घेतला.

तीनही निवडणूक निरीक्षकांनी अधिका–यांची संयुक्त बैठक घेतली. या बैठकीत ७२– बल्लारपूर विधानसभा क्षेत्रातील निवडणूक प्रक्रिया व्यवस्थित आणि नियमानुसार पार पाडण्यासाठीच्या उपाययोजनांवर चर्चा झाली. निवडणूक निर्णय



अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी अजय चरडे, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी मृदुला मोरे, अभय गायकवाड यांनी आपल्या विभागाच्या तयारीचा अहवाल सादर केला.

यावेळी मतदार केंद्रांवरील सुरक्षा व्यवस्था, मतदान यंत्रणांची सुरक्षितता, मॉक पोल प्रक्रिया, मतदारांना सोयीसुविधा, निवडणूक प्रचारावर लक्ष ठेवणे, आणि निवडणूक खर्चाची तपासणी आदी मुद्द्यांवर विशेष चर्चा करण्यात आली. तसेच निवडणुकीच्या दरम्यान कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये, यासाठी आवश्यक उपाययोजनांचा आढावा घेऊन त्याबाबत सर्व संबंधित अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. निवडणूक कार्यात नियमांचे काटेकोर पालन करणे व मतदानाच्या दिवशी योग्य समन्वय साधून सुरक्षित आणि पारदर्शक निवडणूक प्रक्रिया सुनिश्चित करण्यासाठी सर्व विभागांनी एकत्रितपणे काम करावे, अशा सुचनाही निवडणूक निरीक्षकांनी केल्या.

तत्पूर्वी, तिनही निवडणूक निरीक्षकांनी उपविभागीय अधिकारी कार्यालयातील स्ट्राँग रुम परिसराची पाहणी केली. मतपत्रिका आणि इतर निवडणूकसामग्रीचे सुरक्षित संचयन होण्यासाठी स्ट्राँग रूचची सुरक्षितता महत्त्वाची आहे, असे निरीक्षकांनी स्पष्ट केले. यावेळी अवधेश पाठक यांनी तीनस्तरीय सुरक्षा व्यवस्था उभारण्याच्या सूचना दिल्या. तसेच उपविभागीय पोलिस अधिकारी श्री. भगत आणि स्ट्राँग रुमचे व्यवस्थापन करणारे नोडल अधिकारी नंदकिशोर कुंभरे यांना याबाबत सर्वसमावेशक कार्यप्रणाली तयार करून तातडीने अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले

# मनोज जरांगे–पाटील यांना मराठा आरक्षणासाठी प्रतिज्ञापत्र सादर



**मोहोळ । प्रतिनिधी**

मोहोळ विधानसभा मतदारसंघातील राखीव जागेसाठी उमेदवारी अर्ज भरल्यानंतर यशवंत माने यांनी बाळराजे पाटील यांच्या समवेत अंतरवाली सराटी (जालना) येथे मनोज जरांगे–पाटील यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी माने यांनी जरांगे–पाटील यांच्या मार्गदर्शनानुसार मराठा आरक्षणासंदर्भातील सर्व मुद्द्यांचे प्रतिज्ञापत्र सादर केले.मराठा आरक्षणाच्या संघर्षात मनोज जरांगे–पाटील यांचे प्रामाणिक नेतृत्व मान्य करत, बाळराजे पाटील आणि यशवंत माने यांनी सांगितले की, गरजवंत मराठ्यांच्या हक्कांसाठीच्या या लढाईत आम्ही कालही सोबत होतो आणि भविष्यातही कायम पाठीशी उभे राहू.

मराठा आरक्षणासाठी दिल्या जाणाऱ्या या लढाईत मनोज जरांगे–पाटील यांच्या नेतृत्वात कार्य करणार असल्याची हमी देत, या प्रतिज्ञापत्र सादरीकरणाने मराठा समाजासाठीच्या त्यांच्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार करण्यात आला.

# लेखा लिपीक कर्मचाऱ्या साठी महाराष्ट्र लेखा व स्थानिक निधी लेखा गट–क सेवा विभागीय परीक्षा

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

लेखा विषयक काम करणारे लिपीक वर्गीय (वर्ग ३) कर्मचाऱ्यांसाठी १० वी महाराष्ट्र लेखा व स्थानिक निधी लेखा गट–क सेवा विभागीय परीक्षा (भाग १ व २) २०२४ साठी इच्छुक कर्मचाऱ्यांनी ८ नोव्हेंबरपर्यंत विहित नमुन्यातील अर्ज कार्यालय प्रमुखांकडे सादर करावेत, असे आवाहन नाशिक विभाग लेखा व कोषागारे सहसंचालक महेश बच्छाव यांनी केले आहे.कार्यालय प्रमुखांनी परीक्षेसाठी प्राप्त अर्जांची छाननी करुन सहसंचालक, लेखा व कोषागारे, नाशिक विभाग, नाशिक या कार्यालयाकडे १४ नोव्हेंबर २०२४ पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावेत. या परीक्षेचे परिपत्रक https://mahakosh.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर अथवा DAT (mahakosh.in) च्या सूचना फलकावर उपलब्ध आहे. नाशिक विभागातील नाशिक, धुळे, जळगांव, अहमदनगर, नंदुरबार येथील वित्त विभागाचे व इतर विभागातील लेखा विषयक काम करणारे वर्ग ३ कर्मचारी ही परीक्षा देऊ शकतात.

# पालखेडच्या सरपंचाचा समाजासमोर प्रेरणादायी आदर्श

**वैजापूर । प्रतिनिधी**

पालखेड गावचे माजी सरपंच अनिल वाणी यांनी समाजासमोर एक अनोखा आदर्श घालून दिला आहे. दोन मुलांचे पालक असतानाही त्यांनी एका मुलीला दत्तक घेण्याचा निर्णय घेतला. वाणी परिवारातील ही मुलगी समृद्धी हिचा वाढदिवस दरवर्षी दोन वेळा उत्साहाने साजरा केला जातो एकदा तिच्या जन्मदिवशी, २० सप्टेंबर रोजी, आणि दुसऱ्यांदा दत्तक घेण्याच्या दिवशी, २९ ऑक्टोबरला.

या वर्षी वाणी परिवाराने समृद्धीच्या आगमनाचा दिवस नाशिकच्या लासलगाव येथील जय जनार्दन अनाथ व वृद्धाश्रमात साजरा केला. अनाथ मुलांना आणि वृद्धांना नवीन कपडे आणि भोजन देऊन त्यांच्या वाढदिवसाला सामाजिक कार्याचा एक नवा रंग दिला. वृद्धाश्रमातील वृद्धांनी वाणी परिवाराला आशीर्वाद देत असेच कार्य करत राहावे, अशी भावना व्यक्त केली.




वाणी परिवाराने समृद्धीच्या माध्यमातून समाजासमोर संवेदनशीलता आणि आदर्श सामाजिक सेवा यांचा एक उत्तम नमुना सादर केला आहे.

# सात फुटाच्या अजगराला सर्पमित्रांकडून जीवदान

**चिमूर । शेषराव राऊत**

चिमूर तालुक्यातील शंकरपूरपासून आठ किलोमीटर अंतरावर असलेल्या बोरगाव (डोये) शिवारातील एका धानाच्या शेतामध्ये काम करणाऱ्या शेतमजुरांना सात फुटाचा अजगर आढळून आला. ही माहिती मिळताच शंकरपूर येथील सर्पमित्रांना तातडीने संपर्क करण्यात आला. सर्पमित्र आणि वन्यप्रेमींनी घटनास्थळी पोहोचून धानाच्या शेतामध्ये सापडलेला अजगर सुरक्षितरीत्या पकडला व त्याला वनक्षेत्रात सोडून त्याचे प्राण वाचवले.

अजगर साधारणपणे थंड वातावरणात भक्ष्याच्या शोधात असतो, त्याचे प्रमुख खाद्य म्हणजे मुंगूस, ससे, घोरपड किंवा लहान



पाळीव जनावरे. हा साप बिनविषारी असला तरी, त्याचे भक्ष्याला गिळण्याच्या क्षमतेमुळे लोकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होते. अशा वेळी सर्पमित्रांनी धाव घेऊन त्याला सुरक्षित ठिकाणी सोडून दिले.

सर्पमित्र शुभम रासेकर, सोहेल शेख, अभिषेक चंदनखेडे तसेच वन्यप्रेमी समीर बल्की, मंगेश बल्की, आणि पोलिस पाटील यांच्या उपस्थितीत हे रेस्क्यू करण्यात आले. वनविभागाच्या शंकरपूर कार्यालयात अजगराची नोंद केली गेली असून त्याला नंतर जंगलात सोडण्यात आले. या कार्यासाठी सर्पमित्र आणि वन्यप्रेमींचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# निर्घृण हत्येचा निषेध; गुन्हेगारास फाशीची शिक्षा देण्याची अंगणवाडी सेविकांची मागणी

**इंदापूर । दत्तात्रय गवळी**

इंदापूर तालुक्यातील अंगणवाडी सेविकांनी अंगणवाडी सेविका उमा महेश पवार यांच्या हत्येप्रकरणी दोषींना फाशीची शिक्षा देण्याची मागणी केली आहे. या मागणीसाठी इंदापूर पोलीस स्टेशनमध्ये पोलीस उपनिरीक्षक कोकणे यांना निवेदन सादर करण्यात आले. चिंचोडी पाटील तालुक्यातील मारुती वाडी येथील अंगणवाडी केंद्रात कार्यरत असलेल्या उमा पवार यांची निर्दयी हत्या करण्यात आली आहे.




अंगणवाडी सेविकांनी निवेदनाद्वारे या घटनेचा तीव्र निषेध नोंदवत म्हटले की, अंगणवाडी कर्मचारी महिला समाजातील आरोग्य, पोषण आणि बालकांचे शिक्षण यासाठी अहोरात्र कार्यरत असतात, मात्र त्यांच्या सुरक्षेची यापुढे विशेष काळजी घेतली जावी. पुणे जिल्हा उपाध्यक्ष पुनम ताई निंबाळकर यांनी घटनास्थळी न्याय मिळवण्यासाठी या प्रकरणाचा जलदगती न्यायालयात निकाल लावावा आणि दोषींना कठोर शिक्षा व्हावी अशी मागणी केली आहे.

तसेच, पीडित कुटुंबाला शासनाने ५० लाख रुपयांचे सहानुभूतीपर अनुदान मंजूर करावे आणि प्रत्येक अंगणवाडी केंद्रात सीसीटीव्ही कॅमेरे बसवून सुरक्षा उपाययोजना करण्यात यावी, अशीही मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

या वेळी इंदापूर तालुक्यातील शेकडो अंगणवाडी सेविका उपस्थित होत्या, ज्यांनी या क्रूर घटनेचा विरोध दर्शवला आणि दोषींना कठोर शिक्षेची मागणी केली.

# अवैध सुगंधित तंबाखूची १ लाख ८३ हजारांची खेप पोलिसांनी पकडली

## तळोधी पोलीस स्टेशनची कारवाई



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुका २०२४ च्या पार्श्वभूमीवर चंद्रपूर जिल्ह्यात अवैध दारू, जुगार, प्रतिबंधित तंबाखू यांसारख्या बेकायदेशीर व्यवसायांवर पोलिसांनी मोहीम राबवली आहे. या अनुषंगाने मंगळवार, २९ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५.३० वाजता तळोधी पोलीस पेट्रोलिंग करत असताना सावरगाव येथील पेट्रोल पंपाजवळ एक बिनानंबरची पल्सर मोटरसायकल संशयास्पद स्थितीत आढळली. पोलिसांनी मोटरसायकल चालकाला थांबवून त्याच्या बॅगेची तपासणी केली असता, प्रतिबंधित सुगंधित तंबाखू सापडले.

पोलिसांनी तपासणी दरम्यान, ४० नग होला सुगंधित हुक्का शिशा तंबाखूचे २०० ग्रॅम वजनाचे ३२,८०० रुपये किमतीचे साहित्य, १ लाख ४० हजार रुपये किमतीची पल्सर मोटरसायकल, आणि १० हजार रुपयांचा पोको कंपनीचा मोबाईल, असा एकूण १ लाख ८२ हजार रुपयांचा माल जप्त केला. आरोपींची नावे अश्विन युवराज थेरकर आणि अंकुश अरुण वाढई (दोघेही गिरगांव येथील रहिवासी) आहेत.

सदर घटनेप्रकरणी तळोधी पोलीस स्टेशन येथे गुन्हा क्रमांक २०२४ अन्वये अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम २००६ तसेच भारतीय न्याय संहिता २०२३ च्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक रिना जनबंधु, उपविभागीय पोलीस अधिकारी दिनकर ठोसरे यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि. संगिता हेलोंडे, पोलीस उपनिरीक्षक किशोर मानकर आणि तळोधी पोलीस स्टेशनच्या टीमने यशस्वीरीत्या पूर्ण केली.

## जिल्ह्यासाठी सहा निवडणूक निरीक्षक निश्चित

# तीन सामान्य निरीक्षक,दोन खर्च पथक तर एक कायदा व सुव्यवस्था निरीक्षक

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदारसंघासाठी निवडणूक निरीक्षक निश्चित झाले असून यात तीन सामान्य निरीक्षक, दोन खर्च पथक निरीक्षक तर एक कायदा व सुव्यवस्था निरीक्षक आहेत.

सामान्य निवडणूक निरीक्षक : ७० – राजूरा व ७१ – चंद्रपूर विधानसभा मतदारसंघासाठी आर. मुत्यालाराजु रेवु (आय.ए.एस. आंध्र प्रदेश) निवडणूक निरीक्षक असून संपर्कासाठी त्यांचा मोबाईल क्रमांक ९४०५६७११४७ आहे. निवडणूक कालावधीत त्यांच्या निवासाचा पत्ता 'पांगारा' कक्ष, वन अकादमी, मुल रोड चंद्रपूर येथे असून चंद्रपूर व राजुरा मतदारसंघातील नागरीक व राजकीय पदाधिका–यांसाठी ते दररोज सकाळी ११ ते १२ या वेळेत वन अकादमी येथील 'पांगारा' कक्षात उपलब्ध असतील.

७२ – बल्लारपूर व ७३ –ब्रम्हपुरी विधानसभा मतदारसंघाकरीता निवडणूक निरीक्षक म्हणून संगिता सिंग (आय.ए.एस. बिहार) असून संपर्कासाठी त्यांचा मोबाईल क्रमांक ९१४५७६८९९२ आहे. त्यांच्या निवासाचा पत्ता 'शामली' कक्ष, वन अकादमी, चंद्रपूर येथे असून नागरीक व राजकीय पदाधिका–यांसाठी त्या दररोज सकाळी ९.३० ते १०.३० या वेळेत वन अकादमी येथील 'शामली' येथे उपलब्ध असतील.

७४ – चिमूर व ७५ – वरोरा विधानसभा मतदारसंघाकरीता संजय कुमार (आय.ए.एस. उत्तर प्रदेश) असून संपर्कासाठी त्यांचा मोबाईल क्रमांक ९४०३४७३१४७ आहे. त्यांच्या निवासाचा पत्ता 'पलाश' कक्ष, वन अकादमी, चंद्रपूर येथे आहे. नागरिकांसाठी दररोज सकाळी १० ते ११ या वेळेत ते वन अकादमी येथील 'पलाश' येथे उपलब्ध असतील.

खर्च पथक निरीक्षक : ७० – राजुरा, ७१ – चंद्रपूर आणि ७२ – बल्लारपूर विधानसभा मतदारसंघासाठी खर्च पथक निरीक्षक म्हणून आदित्य बी. (आय.आर.एस.) असून त्यांचा मोबाईल क्रमांक ९४२२५८०१४७ आहे. त्यांच्या निवासाचा पत्ता खोली क्रमांक २०३, पहिला माळा, रामबाग रेस्ट हाऊस, चंद्रपूर आहे. नागरिकांसाठी तसेच राजकीय पदाधिका–यांसाठी ते सकाळी १० ते १२ या वेळेत रामबाग रेस्ट हाऊस, चंद्रपूर येथे उपलब्ध असतील.

७३ – ब्रम्हपुरी, ७४ – चिमूर आणि ७५ – वरोरा विधानसभा मतदारसंघासाठी खर्च पथक निरीक्षक म्हणून धर्मेंद्र सिंह (आय.आर.एस.) असून त्यांचा मोबाईल क्रमांक ९१४५७६७९४९ आहे. त्यांच्या निवासाचा पत्ता खोली क्रमांक २०१, पहिला माळा, रामबाग रेस्ट हाऊस, चंद्रपूर आहे. नागरिकांसाठी तसेच राजकीय पदाधिका–यांसाठी ते सकाळी ११ ते १२ या वेळेत रामबाग रेस्ट हाऊस, चंद्रपूर येथे उपलब्ध असतील.कायदा व सुव्यवस्था निरीक्षक : जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदारसंघासाठी कायदा व सुव्यवस्था निरीक्षक म्हणून अवधेश पाठक (आय.पी.एस.) असून त्यांचा मोबाईल क्रमांक ९४०४०६३१४७ आहे. त्यांचा निवासाचा पत्ता 'बकूल' वन अकादमी, चंद्रपूर असून नागरिकांसाठी ते सकाळी १० ते ११ या वेळेत उपलब्ध राहणार असल्याचे जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी कळविले आहे

# राहुरीत शिवाजीराव कर्डिले यांचा उमेदवारी अर्ज दाखल: शक्तीप्रदर्शनात जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**राहुरी | प्रतिनिधी**

राहुरी नगर-पाथर्डी विधानसभा मतदारसंघातून भारतीय जनता पक्षाचे अधिकृत उमेदवार आणि माजी मंत्री शिवाजीराव कर्डिले यांनी मंगळवारी भव्य शक्तीप्रदर्शन करीत उमेदवारी अर्ज दाखल केला. मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या जनसमुदायासमोर कर्डिले यांनी सत्ताधारी लोकप्रतिनिधींवर टीका करत, जनतेच्या प्रश्नांसाठी पुन्हा निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले.

विधानसभा निवडणुकीत उतरायचा माझा विचार नव्हता, परंतु जनतेचा आग्रह आणि प्रेम पाहता मी पुन्हा मैदानात उतरलो आहे. मागील निवडणुकीत पराभूत झाल्यानंतर विद्यमान लोकप्रतिनिधींनी दिलेली



आश्वासने पूर्ण न केल्याने मतदारसंघातील नागरिक निराश झाले आहेत, असे कर्डिले यांनी सांगितले. त्यांनी विद्यमान लोकप्रतिनिधी प्राजक्त तनपुरे यांचे नाव न घेता टीका करताना सांगितले की, पाणीपुरवठा योजना आणि आरोग्य केंद्रे यांसारखी मंजूर केलेली विकासकामे सध्याच्या लोकप्रतिनिधींनी अडवली आहेत.

उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर राहुरी शहरातून काढलेल्या रॅलीत शिवाजीराव कर्डिले यांचे ठिकठिकाणी फुलांच्या वर्षावात स्वागत करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ नेते सुभाष पाटील, जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, युवा नेते अक्षय कर्डिले यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती होती.

अक्षय कर्डिले म्हणाले, गेल्या ३० वर्षांत माझे वडील शिवाजीराव कर्डिले यांनी कुटुंबाकडे दुर्लक्ष करून समाजसेवा केली. जनतेच्या सुख-दुःखात सहभागी होत त्यांनी जनतेला आधार दिला. तसेच, मागील निवडणुकीतील पराभवाबद्दल आत्मचिंतन करत, जनतेने आमच्या कुटुंबावर खूप प्रेम केले, त्याच प्रेमासाठी आम्ही पुन्हा समर्पित आहोत, असे त्यांनी म्हटले.

ज्येष्ठ नेते सुभाष पाटील यांनी शिवाजीराव कर्डिले यांना सर्वसामान्य जनतेचा नेता म्हणून गौरवले आणि सांगितले की, वांबोरी परिसरात सौर ऊर्जा प्रकल्प उभा करण्यासाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी मोठा निधी मंजूर केला आहे.

मोठ्या संख्येतील कार्यकर्ते आणि समर्थकांसमोर बोलताना शिवाजीराव कर्डिले यांनी भविष्यातील विकासकामांचे आश्वासन देत, राहुरी मतदारसंघात जनतेसाठी लढण्याची तयारी दर्शवली.

# जिल्ह्यात कलम ३७ लागू

**चंद्रपूर | प्रतिनिधी**

जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमिवर आदर्श आचार संहिता लागू झाली आहे. तसेच विविध धार्मिक कार्यक्रम व दिवाळी सण, गुरुनानक जयंतीती असल्याने १ नोव्हेंबर ते १५ नोव्हेंबरच्या रात्री १२ वाजेपर्यंत महाराष्ट्र पोलिस अधिनियम, १९५१ चे कलम ३७ (१)(३) लागू करण्यात आले आहे. सदर कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या दृष्टीने विवक्षित कृतींना मनाई व प्रतिबंधात्मक उपाय म्हणून खालील गोष्टींना मनाई करण्यात आली आहे.

१. शस्त्र, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदूका, सुरे, काठया, लाठया किंवा शारिरीक इजा करण्यासाठी वापरता येईल अशी इतर कोणतीही वस्तु बरोबर नेणे. कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बरोबर नेणे. दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे किंवा क्षेपणास्त्र सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे किंवा साधणे बाळगणे, जमा करणे किंवा तयार करणे. व्यक्तीच्या किंवा प्रेताच्या किंवा आकृत्या किंवा त्यांच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन करणे. जाहीरपणे घोषणा करणे, गाणी म्हणने, वाद्ये वाजविणे, ज्यामुळे सभ्यता अगर नितीमता यास धक्का पोहचेल अशी किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्यामध्ये उलथवून टाकण्याची प्रवृती दिसून येत असेल अशी आवेशपूर्ण भाषणे करणे, हावभाव करणे ,अगर सोंग आणणे आणि अशी चित्रे, चिन्हे फलक किंवा इतर कोणताही जिन्नस किंवा वस्तु तयार करणे त्याचे प्रदर्शन करणे किंवा त्याचा जनतेत प्रसार करणे.

२. तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी अथवा संबंधित पोलिस स्टेशन अधिकारी (जे लागू असेल ते) यांचे पूर्वपरवानगीशिवाय कोणीही सभा, मोर्चा, उत्सव व मिरवणूक काढू नये, पाच इसम किंवा त्यापेक्षा जास्त इसम सार्वजनिक जागेत, सार्वजनिक रस्त्यावर किंवा सार्वजनिक चावडीवर जमा होणार नाहीत किंवा कोणतेही कार्यक्रम आयोजित करणार नाही. हा आदेश संपूर्ण चंद्रपूर जिल्हयाच्या क्षेत्राकरीता लागू राहतील.

३. या आदेशाच्या प्रती उपविभागीय दंडाधिकारी, (सर्व) तालुका दंडाधिकारी (सर्व), संवर्ग विकास अधिकारी (सर्व) महानगरपालिका/नगर परिषद /नगर पंचायत/ ग्राम पंचायत (सर्व) पोलीस स्टेशन अधिकारी (सर्व) यांचे नोटीस बोर्डावर लावून प्रसिध्द करावे. हा आदेश सहज दिसण्याजोग्या जागी लावावा, हा आदेश कर्तव्यावरील शासकीय कर्मचारी यांना लागू होणार नाही. हे आदेश आज दिनांक ३० ऑक्टोबर २०२४ रोजी जिल्हादंडाधिकारी यांच्या स्वाक्षरीने निर्गमित करण्यात आला आहे.

# वर्धा जिल्ह्यात समीर देशमुख यांच्यासह १३ जणांचे नामांकन अर्ज अपात्र

**वर्धा | प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीसाठी नामांकन अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख २९ ऑक्टोबर होती. आज, ३० ऑक्टोबर रोजी या अर्जांची छाननी करण्यात आली, ज्यामध्ये वर्धा विधानसभेतील शरद पवार यांचे उमेदवार समीर सुरेश देशमुख यांच्या अर्जासह, आर्वी विधानसभा मतदारसंघात १, देवळी विधानसभा मतदारसंघात ४, हिंगणघाट मतदारसंघात ४ आणि वर्धा विधानसभा मतदारसंघात ४ असे एकूण १३ अर्ज अपात्र ठरविण्यात आले.



आर्वी विधानसभा मतदारसंघात महेश गाडरे (अपक्ष) यांचा एक अर्ज अपात्र झाला. देवळी मतदारसंघात विठ्ठल मुन (अपक्ष) यांचे दोन, शुध्दोधन महादेव मेंढे (अपक्ष) यांचा एक, आणि अब्दुल समीर अब्दुल हमीद शेख (अपक्ष) यांचा एक अर्ज अपात्र ठरला. हिंगणघाटमध्ये कोमल किशोर बावने (भारतीय जनसम्राट पार्टी) यांचा एक, कौशल्यखान जब्बारखान पठाण (अपक्ष) यांचा एक, अनील महादेवराव मुन (रिपब्लीकन पाटी ऑफ इंडिया - ए) यांचा एक, आणि संजय विठ्ठलराव राऊत (हिंद राष्ट्र संघ) यांचा एक अर्ज अपात्र ठरला.

वर्धा विधानसभा मतदारसंघात अनोमदर्शी उध्दवराव भैसारे (बहुजन समाज पार्टी) यांचा एक अर्ज अपात्र ठरला, तर रवी प्रमोद शेंडे (भाराकॉ) यांचा एक अर्ज अपात्र आणि एक अर्ज पात्र ठरला. समीर सुरेश देशमुख (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी - शरदचंद्र पवार) यांचा एक अर्ज अपात्र आणि एक अर्ज पात्र ठरला. निखील सातपुते (अपक्ष) यांचा एक अर्ज अपात्र आणि एक अर्ज पात्र ठरला.या अर्जांची छाननी केल्यानंतर, वर्धा जिल्ह्यातील निवडणूक प्रक्रियेसाठी पुढील पावले उचलण्यात येणार आहेत.

# रस्त्यावर पडला पैशांचा पाऊस;मालक कोण? निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अलिबागमधील घटनेने खळबळ



**अलिबाग | प्रशांत कुंडकर**

विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अलिबाग तालुक्यातील गोंधळपाडा रस्त्यावर पाचशे रुपयांच्या नोटांचा पाऊस पडल्याने खळबळ उडाली आहे. स्थानिक नागरिकांना रस्त्यावर पडलेल्या नोटा सापडल्याने या घटनेमुळे आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

निवडणुकांच्या रणधुमाळीत रस्त्यावर पैसे सापडण्याच्या या घटनेने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. पैशांचे बंडल आणि उघड्या नोटा रस्त्यावर पडल्याचे दिसून आले. अनेक नागरिकांनी नोटा उचलून त्वरित तिथून काढता पाय घेतला. काही जागृत नागरिकांनी मात्र हे पैसे पोलिसांच्या स्वाधीन केले.

या संदर्भात एका प्रत्यक्षदर्शीने सांगितले की, गोंधळपाडा रस्त्यावर गर्दी पाहून मी थांबलो. सुरुवातीला अपघात झाला असावा, असे वाटले. मात्र जवळ गेल्यानंतर नागरिक रस्त्यावर पडलेल्या नोटा उचलत असल्याचे लक्षात आले. काहींनी ५००-५०० रुपयांच्या नोटा गोळा केल्या होत्या आणि लगेच तेथून निघून गेले.

अशातच एका तरुणीनेही या घटनेची माहिती दिली आहे. तिच्या म्हणण्यानुसार, मी गोंधळपाडा रस्त्यावरून एसपी ऑफिसला जात असताना मला रस्त्यावर अडीच हजार रुपये सापडले. काही पैसे खुले तर काही बंडल स्वरूपात होते. मिळालेले पैसे मी पोलिसांना दिले आहेत.

दरम्यान, या घटनेची निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विशेष दखल घेतली जात असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

# वर्ध्यात पहिल्यांदाच खासदार पत्नी, भाऊ-भाऊ, पती-पत्नी मैदानात

**वर्धा | प्रतिनिधी**

वर्धा जिल्हा चमत्कारांचा जिल्हा म्हणून ओळखला जातो, आणि येथे विधानसभा निवडणुकीत काहीही घडू शकते. यंदा खासदार पत्नी मयूरा अमर काळे आमदारकीसाठी मैदानात उतरल्या आहेत. याशिवाय, कोटंबकर दाम्पत्याने अपक्ष उमेदवारी दाखल केली आहे. काँग्रेसचे शेखर शेंडेंनी आणि त्यांच्या बंधू रवी शेंडेंनी देखील उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.




वर्धा जिल्हा काँग्रेसचा एक मजबूत बालेकिल्ला मानला जातो. लोकसभा निवडणुकीत शरद पवारांनी वर्धा लोकसभा मतदारसंघ जिंकला, आणि आता विधानसभेत आर्वीतून काँग्रेसचा पंजा गायब झाला आहे. यामुळे वर्धा जिल्ह्यात खासदार पत्नीने प्रथमच आमदारकीसाठी उमेदवारी दाखल केल्याने चर्चांना उधाण आले आहे.

गेल्या पंचवार्षिकात अपक्ष उमेदवारी दाखल करणारे रवींद्र कोटंबकर यांनी स्वतःसह त्यांच्या पत्नी रेणुका यांचाही अर्ज दाखल केला आहे. तसेच, पाच वेळा आमदार आणि विधान परिषदेचे उपाध्यक्ष राहिलेले प्रमोद शेंडेंच्या चिरंजीव शेखर यांना काँग्रेसने चौथ्यांदा उमेदवारी दिली आहे. यासोबतच शेखर शेंडेंचे थोरले बंधू रवी शेंडेंनीही उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

उमेदवारी मागे घेण्याची अंतिम तारीख ४ नोव्हेंबर आहे. त्या दिवसापर्यंत कोणत्या अपक्ष उमेदवारांनी मैदानात राहावे हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. वर्धा जिल्ह्यातील या घटनाक्रमामुळे आगामी निवडणुकांमध्ये चुरस निर्माण होण्याची शक्यता आहे.

# निवडणूक प्रक्रिया पारदर्शकपणे राबवा निवडणूक निरीक्षक जय प्रकाश सिंग

**वर्धा | प्रतिनिधी**

आर्वी विधानसभा मतदार संघांतर्गत निवडणूक प्रक्रिया पारदर्शकपणे राबवण्यासाठी सर्व निवडणूक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सजग राहून कोणत्याही प्रकारचा आचार संहितेचा भंग होणार नाही याची दक्षता घेण्याचे निर्देश निवडणूक निरीक्षक (सामान्य) जय प्रकाश सिंग यांनी दिले. त्यांनी ४४-आर्वी विधानसभा मतदार संघातील निवडणूक कार्यालयास भेट देऊन कामाचा आढावा घेतला.



विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने, जय प्रकाश सिंग यांनी निवडणूक कार्यालयाची प्रत्यक्ष पाहणी केली. या वेळी निवडणूक निर्णय अधिकारी विश्वास शिरसाट, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी हरीश काळे, एश्वर्या गिरी आणि हंसा मोहने यांसह सर्व तहसिलदार उपस्थित होते.

निवडणूक निरीक्षकांनी निवडणूक आयोगाच्या नियमानुसार मतदान केंद्रांवर मतदारांना आवश्यक सोयी-सुविधा पुरविण्यात याव्यात, तसेच मतदारांची गैरसोय होणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना दिल्या.

आर्वी विधानसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी विश्वास शिरसाट यांनी याबाबत माहिती दिली.

# चंद्रपूर, वरोरा, चिमुर व ब्रम्हपुरी विधानसभा क्षेत्रात हंसराज अहीर यांचा पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद

**चंद्रपूर | प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पूर्व केंद्रीय गृहराज्यमंत्री हंसराज अहीर यांनी २९ ऑक्टोबर रोजी वरोरा, चिमुर व ब्रम्हपुरी विधानसभा मतदार क्षेत्रात दौरा केला. वरोरा येथे भाजप-महायुतीचे उमेदवार करण देवतळे यांच्या नामांकन रॅलीत सहभागी होत त्यांनी विजयाची शंखनाद केला. या रॅलीत विविध क्षेत्रांतील नागरिकांनी उत्स्फुर्तपणे सहभाग घेतला.

अहीर यांनी चिमुर विधानसभा क्षेत्राचे महायुतीचे उमेदवार किर्तीकुमार भांगडीया यांची भेट घेऊन त्यांना विजयासाठी शुभेच्छा दिल्या. तसेच, भाजपाच्या वतीने आयोजित तालुक्यातील सरपंच, उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्यांच्या मेळाव्यात हंसराज अहीर उपस्थित राहून भाजप उमेदवाराच्या विजयासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले.

ब्रम्हपुरी विधानसभा क्षेत्राचे भाजप-महायुतीचे लोकप्रिय उमेदवार कृष्णा सहारे यांच्या उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या रॅलीतही अहीर यांनी उपस्थिती दर्शविली. या प्रसंगी त्यांनी भाजप-महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या संयुक्त बैठकीस संबोधित करत भाजप उमेदवाराला विजयी करण्याचे आवाहन केले.

यावेळी वरोरा येथे माजी आमदार ॲड. संजय धोटे, सुदर्शन निमकर आणि अन्य पदाधिकारी उपस्थित होते, तर ब्रम्हपुरीतील बैठकीत माजी खासदार अशोक नेते आणि माजी आमदार अतुल देशकर यांची प्रमुख उपस्थिती होती.





चंद्रपूर येथे दि. २९ ऑक्टोबर रोजी महेश भवन तुकुम येथे भाजपा पदाधिकारी, शक्ती केंद्र प्रमुख आणि बुथ प्रमुखांची बैठक घेण्यात आली. या बैठकीत हंसराज अहीर यांनी मार्गदर्शन करत भाजप-महायुतीचे उमेदवार किशोर जोरगेवार यांना मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन केले. या बैठकीस आमदार किशोर जोरगेवार यांनीही संबोधित केले. कार्यक्रमास पक्षाचे प्रमुख पदाधिकारी व शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .

# सहा विधानसभा मतदारसंघात १२० उमेदवारांचे नामांकन वैध तर ३० जणांचे अवैध

**चंद्रपूर । प्रतिनिधी**
नामांकन अर्ज छाननीच्या दिवशी आज (दि. ३०) जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदारसंघातील १२० उमेदवारांचे नामांकन वैध तर ३० जणांचे नामांकन अवैध ठरले.

७० - राजूरा विधानसभा मतदारसंघात १७ उमेदवारांचे अर्ज वैध तर २ अवैध : वैध नामांकनामध्ये सुभाष रामचंद्र धोटे, वामनराव सदाशिव चटप, प्रिया बंडू खाडे, निनाद चंद्रशेखर बोरकर, संजय यादवराव धोटे, चित्रलेखा कालिदास धंदरे, सुदर्शन भगवानराव निमकर, देवराव विठोबा भोंगळे, सचिन बापुराव भोयर, गजानन गोदरु जुमनाके, प्रवीण रामराव कुमरे, रेश्मा गणपत चव्हाण, भुषण मधूकर फुसे, प्रवीण रामदास सातपाडे, मंगेश हिरामन गेडाम, किरण गंगाधर गेडाम, अभय मारोती डोंगरे.

अवैध नामांकनामध्ये अरुण रामचंद्र धोटे आणि वामन उध्दवजी आत्राम यांचा समावेश आाहे.

७१- चंद्रपूर विधानसभा मतदारसंघात १७ उमेदवारांचे नामांकन अर्ज वैध तर १७ जणांचे अवैध : वैध नामांकनामध्ये सुरेश मल्हारी पाईकराव, नभा संदीप वाघमारे, राजेश भीमराव घुटके, किशोर गजानन जोरगेवार, प्रियदर्शन अजय इंगळे, प्रवीण नानाजी पडवेकर, मिलिंद प्रल्हाद दहिवले, ज्ञानेश्वर एकनाथ नगराळे, भानेश राजम मातंगी, विनोद कवडूजी खोब्रागडे, प्रकाश शंकर रामटेके, मनोज गोपीचंद लाडे, प्रकाश उद्धवराव ताकसांडे, ब्रिजभूषण महादेव पाझारे, राजू चिन्नय्या झोडे, आनंद सुरेशराव इंगळे, आणि रतन प्रल्हाद गायकवाड.

अवैध नामांकनामध्ये भुवनेश्वर पद्माकर निमगडे, कोमल किशोर जोरगेवार, मोरेश्वर कोदूजी बडोले, विशाल शामराव रंगारी, अरुण देविदास कांबळे, बबन रामदास कासवटे, आशिष अशोक माशीरकर, स्नेहल देवानंद रामटेके, संजय निळकंठ गावंडे, ज्ञानदेव भजन हुमणे, देवानंद नामदेवराव लांडगे, भीमनवार संजय परशुराम, राहुल अरुण घोटेकर, प्रवर्तन देवराव आवळे, महेश मारोतराव मेंढे, प्रतीक विठ्ठल डोरलीकर, अशोक लक्ष्मणराव मस्के यांचा समावेश आहे.

७२ बल्लारपूर विधानसभा मतदारसंघात २७ उमेदवारांचे अर्ज वैध, अवैध निरंक : वैध नामांकनामध्ये रावत संतोषसिंह चंदनसिंह (इंडियन नॅशनल काँग्रेस),किशोर बंडू उइके (अपक्ष), संजय निलकंठ गावंडे (अपक्ष), रामराव ओंकार चव्हाण (अपक्ष), निशा शितलकुमार धोंगडे (अपक्ष), राजु देविदास जांभुळे (अपक्ष), सतीश मुरलीधर मालेकर (वंचित बहुजन आघाडी), कुणाल पुरूषोत्तम गायकवाड (अपक्ष), सुधीर सच्चिदानंद मुनगंटीवार (भारतीय जनता पार्टी), अरूण देविदास कांबळे (रिपब्लीकन पार्टी इंडिया (रिफॉरमिस्ट), अभिलाषा राकेश गावतुरे (अपक्ष), प्रकाश मुरलीधर पाटील (अपक्ष), रब्बानी याकुब सय्यद (अपक्ष), उमेश राजेश्वर शेंडे (पीपल्स पार्टी ऑफ इंडिया (डेमाक्रेटीक), मनोज धर्मा आत्राम (गोंडवाना गणतंत्र पार्टी), संजय मारोतराव घाटे (अपक्ष), सत्यपाल राघोजी कातकर (रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडिया (ए)), गावतुरे छाया बंडू (अपक्ष), गावतुरे अनीता सुधाकर (अपक्ष), नरेन्द्र शंकर सोनारकर (बहुजन समाज पार्टी), सचिन राजबहुरण रावत (अपक्ष), राकेश नामदेवराव गावतुरे (अपक्ष), भारत सोमाजी थुलकर (ऑल इंडीयन रिपब्लीकन पार्टी), संजय शंकर कन्नावार (राष्ट्रीय समाज पक्ष), सैय्यद अफजल अली सैय्यद आबिद अली (अपक्ष), संदिप अनिल गिऱ्हे (अपक्ष) विरेंद्र भीमराव कांबळे (अपक्ष). अवैध नामांकनाची संख्या निरंक

७३ - ब्रम्हपुरी मतदारसंघात १७ उमेदवारांचे अर्ज वैध तर २ अवैध : वैध नामांकनामध्ये विजय वडेट्टीवार (इंडियन नॅशनल काँग्रेस), कृष्णालाल साहारे (भाजपा), केवळराम पारधी (बसपा), सुधीर टोंगे (राष्ट्रवादी समाज पार्टी), गोपाळ मेंढे (बीआरएसपी), विनोद नावघडे (अपक्ष), वसंत वर्जुरकर (अपक्ष), गुरुदेव भोपये (अपक्ष), सुधाकर श्रीराम (अपक्ष), अनंता भोयर (पीपल्स पार्टी ऑफ इंडिया), चक्रधर मेश्राम (जन जनवादी पक्ष), प्रशांत डांगे (आरपी रिपा), रमेश मडावी (अपक्ष), नारायण जमभुळे( स्वाभिमानी पक्ष), राहुल मेश्राम( वंचित बहुजन आघाडी), रमेश समर्थ (रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया - ए), प्रेमलाळ मेश्राम (अपक्ष).

अवैध नामांकनामध्ये चक्रधर जांभुले (कृतीशील गणराज्य पक्ष) आणि पराग सहारे (अपक्ष).

७४ - चिमूर मतदारसंघात १८ उमेदवारांचे अर्ज वैध तर ४ अवैध : वैध नामांकनामध्ये सतिश मनोहर वारजुकर (काँग्रेस), किर्तीकुमार मितेश भांगडीया (भाजपा), अरविंद आत्माराम सांदेकर (वंचित बहुजन आघाडी), डॉ. प्रकाश नक्कल नान्हे (पिझन्टस अँड वर्कर्स पार्टी ऑफ इंडिया), निकेश प्रल्हाद रामटेके (बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टी), अमित हरीदास भिमटे (आझाद समाज पार्टी), नारायण दिनबाजी जांभुळे (स्वाभीमानी पक्ष), अरविंद आत्माराम सांदेकर (अपक्ष), अनिल अंबादास धोंगडे (अपक्ष), हेमंत गजानन दांडेकर (अपक्ष), धनराज रघुनाथ मुंगले (अपक्ष), कैलास श्रीहरी बोरकर (अपक्ष), योगेश नामदेवराव गोन्नाडे (अपक्ष), ङ हेमंत सुखदेव उरकुडे (अपक्ष), मडावी मनोज उध्दवराव (अपक्ष), रमेश बाबुराव पचारे (अपक्ष), जितेंद्र मुरलीधर ठोंबरे (अपक्ष), केशव सिताराम रामटेके (अपक्ष).

अवैध नामांकनामध्ये धनराज रघुनाथ मुंगले (काँग्रेस), दांडेकर भाऊराव लक्ष्मण (काँग्रेस), राजेंद्र हरिश्चंद्र रामटेके (बहुजन समाज पार्टी) आणि ङ हेमंत सुखदेव उरकुडे (अपक्ष)

७५ - वरोरा मतदारसंघात २४ उमेदवारांचे अर्ज वैध तर ५ अवैध : वैध नामांकनामध्ये प्रवीण सुरेश काकडे (इंडियन नॅशनल काँग्रेस), विनोद कवडूजी खोब्रागडे (अपक्ष), अमोल दिलीप बावणे (अपक्ष), राजू मारोती गायकवाड (अपक्ष), जयवंत नथुजी काकडे ( बीआरएसपी ), जयंत मोरेश्वर टेमुडे ( अपक्ष), अहेते श्याम सदाकत अली (प्रहार जनशक्ती), श्रीकृष्ण धुमदेव दडमल (अपक्ष), रंजना मनोहर पारशिवे (अपक्ष), करण संजय देवतळे (भाजपा), मुकेश मनोज जीवतोडे (अपक्ष), चेतन गजानन खुटेमाटे (अपक्ष), महेश पंढरीनाथ ठेंगणे (अपक्ष), मुनेश्वर बापूराव बदखल (अपक्ष), रमेश महादेवराव राजुरकर (अपक्ष), प्रवीण धोंडूजी सुर (मनसे), प्रवीण मनोहर खैरे (अपक्ष), नरेंद्र नानाजी जीवतोडे (अपक्ष), सुभाष जगन्नाथ ठेंगणे (अपक्ष), अतुल ईश्वर वानकर (अपक्ष), अनिल नारायण धानोरकर (वंचित बहुजन आघाडी), सागर अनिल वरघणे (बहुजन समाज पक्ष), तारा महादेवराव काळे (अपक्ष), सेवकदास कवडूजी बरके (पीपल्स पार्टी ऑफ इंडिया ( डेमोक्रेटिक) यांचा समावेश आहे.

अवैध नामांकनामध्ये दिनेश दादाजी चोखारे (इंडियन नॅशनल काँग्रेस व अपक्ष), रमेश कवडुजी मेश्राम (गोंडवाना गणतंत्र पार्टी व अपक्ष), नामदेव किसनाजी ढुमणे (अपक्ष), अंबर दौलत खानेकर (राष्ट्रीय समाज पक्ष) आणि सुमितकुमार नामदेव चंद्रागडे (अपक्ष) यांचा समावेश आहे.

# दिवाळीच्या तोंडावर ई-केवायसी अभावी सिलिंडरचा खोडा

**सेलू । प्रतिनिधी**
दिवाळीच्या सणाच्या काळात गॅस सिलिंडरच्या नोंदणी प्रक्रियेत ई-केवायसीची अडचण निर्माण झाली आहे. पूर्वी गॅस सिलिंडरची नोंदणी करताना ई-केवायसीची आवश्यकता नव्हती, पण आता नोंदणी झाल्यानंतर फक्त ई-केवायसी केलेल्यांनाच त्यांच्या रजिस्टर मोबाइलवर ओटीपी प्राप्त होतो. ओटीपी आल्यानंतरच ग्राहकांना घरपोच सिलिंडर मिळतो, ज्यामुळे अनेक ग्राहक ऐन दिवाळीच्या तोंडावर सिलिंडरअभावी वंचित राहण्याची स्थिती ओढवली आहे.



याआधी, मोबाइलवरून गॅस सिलिंडरची नोंदणी केली की, दुसऱ्या दिवशीच सिलिंडर घरात येत होता. आता मात्र, गॅस एजन्सीमध्ये जाऊन ई-केवायसी करणे अनिवार्य झाले आहे. एजन्सीधारकांनी ग्राहकांना याबाबत आगाऊ सूचना दिल्या होत्या, परंतु अनेकांनी याकडे दुर्लक्ष केले. ई-केवायसी न करता सिलिंडर बुकिंग होत नसल्याने अनेक ग्राहक गॅस एजन्सीत धाव घेत आहेत. या प्रक्रियेत ग्राहकांना आधारकार्ड, मोबाइल नंबर आणि डोळ्याचे स्कॅनिंग करून नोंदणी करावी लागते, जे काही मिनिटांत पूर्ण होते.

दिवाळीच्या तोंडावर ई-केवायसीची अडचण असल्याने ग्राहकांची धावपळ सुरू आहे. काही ग्राहक आधारकार्डवरून सपरनाचा वापर करून गॅस कनेक्शन घेत आहेत.

याशिवाय, उज्ज्वला योजनेअंतर्गत महिलेच्या नावावर तीन सिलिंडर मोफत मिळतात. अनेक पुरुष घरच्या महिलांच्या नावावर गॅस कनेक्शन घेत असल्याचे दिसून येत आहे, तथापि गॅस एजन्सीकडून ही प्रक्रिया सध्या बंद आहे आणि ती दिवाळीनंतर सुरू होणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

अशा परिस्थितीत, ग्राहकांना याप्रकरणात तातडीने लक्ष देणे गरजेचे आहे, अन्यथा दिवाळीच्या सणाला गॅस सिलिंडर मिळवण्यात अडचणी येऊ शकतात.

# अमरावतीत तरूणीचे अपहरण करून सामूहिक अत्याचार

**अमरावती । प्रतिनिधी**
आईसोबत झालेल्या वादानंतर रागाच्या भरात घरून निघून गेलेल्या एका तरुणीचे अपहरण करून तिच्यावर सामूहिक अत्याचार करण्यात आला. ही धक्कादायक घटना बुधवार, ३० ऑक्टोबर रोजी गाडगेनगर ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आली.

घटनेनंतर काही तासांतच या प्रकरणातील पाचही आरोपींना गाडगेनगर पोलिसांनी अटक करून गजाआड केले. आरोपींपासून एक चारचाकी व दोन दुचाकी असा ५ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे पुढीलप्रमाणे आहेत: मनोज राजरत्न डोंगरे (२९) रा. न्यू कॉटन मार्केट मागे, लक्ष्मीनगर, अमरावती; अक्षय धनराज सरदार (२९); अजय अशोक लोखंडे (२८) रा. कपिलवस्तूनगर, अमरावती; मिलिंद अरुणराव डाहाट (२९) रा. भीमनगर, अमरावती; व प्रथम गौतम धाडसे (१९) रा. मसानगंज, अमरावती.





पीडित २५ वर्षीय तरुणीचा मंगळवार, २९ ऑक्टोबर रोजी रात्री १०.३० वाजता तिच्या आईसोबत किरकोळ वाद झाला. त्यानंतर रागाच्या भरात ती घरून निघून गेली. पायदळ शेगाव नाका चौकात पोहोचल्यावर तिने एक दुचाकी थांबविली, ज्यावर दोन युवक बसले होते. तरुणी त्यांच्या दुचाकीवर बसल्यानंतर ते तिला नांदगाव पेठ मार्गाने घेऊन गेले.

मार्गावरील एका बारवर थांबून, त्या दोघांनी बियरच्या बाटल्या विकत घेतल्या. त्याचवेळी त्यांनी चारचाकी वाहनासह आणखी तिघांना तिथे बोलावले. त्यानंतर पाचही जण पीडित तरुणीला चारचाकी वाहनामध्ये बसवून नांदगाव पेठ मार्गाने घेऊन गेले, जिथे त्यांनी तिच्यावर अत्याचार केला. काही वेळाने पीडित तरुणीला साईनगर परिसरात सोडून आरोपींनी तेथून पळ काढला.सदर घटनेनंतर, पीडित तरुणीने गाडगेनगर ठाणे गाठून तक्रार दाखल केली. तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास आरंभला. तपासात नांदगाव पेठ मार्गावरील संबंधित बारमधील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करण्यात आली. त्यावेळी एक व्यक्ती पीडित तरुणीला हात पकडून घेऊन जात असताना दिसून आला. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजच्या आधारावर त्या व्यक्तीचा शोध घेत त्याला अटक केली. चौकशीत त्याने आपली ओळख मनोज डोंगरे अशी सांगितली आणि गुन्ह्याची कबुली दिली. सोबतच त्याने आपल्या सहकाऱ्यांची नावेही पोलिसांना सांगितली. त्यानुसार पोलिसांनी त्याचे सहकारी अक्षय सरदार, अजय लोखंडे, मिलिंद डाहाट व प्रथम धाडसे यांना अटक केली. त्यांच्याकडून गुन्ह्यात वापरलेली एक चारचाकी व दोन दुचाकी असा ५ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

# रोटरीची संगीतमय दिवाळी पहाट

**चंद्रपूर । प्रतिनिधी**
दिपावलीच्या विशेष दिवशी, रोटरी क्लब ऑफ चंद्रपूरच्या वतीने बुधवार, ३० ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी ६ वाजता हॉटेल एन.डी. येथे 'दिवाळी पहाट' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. रोटरी परिवारातील सदस्यांनी सरस गीते सादर करून रसिक श्रोत्यांना दिवाळी पहाट संगीतमय केली.




दिवाळीच्या शुभेच्छांचे आदानप्रदान करण्याच्या हेतूने रोटरी क्लबने हा कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी सर्व सदस्यांनी पारंपरिक वेशभूषा केली होती. कार्यक्रमाची सुरुवात रोटरीचे अध्यक्ष अजय पालारपवार, सचिव मिलिंद बोडखे, आणि अन्य प्रमुख सदस्यांच्या उपस्थितीत दीप प्रज्वलनाने झाली.


कार्यक्रमाच्या सुरुवातीला गणेश वंदनासह वैदेही तेलंग आणि काव्या यांनी नृत्य सादर केले. अनया अनिशा भारत यांनी दिपावली मनाए सुहानी हे गीत सादर केले. आर्यन भागरिया आणि रिचा भागरिया यांनी हर हर शंभो हे गीत सादर करून उपस्थितांना रोमांचित केले. सचिन गांगरेड्डीवार, डॉ. अशोक वासलवार, आणि अन्य कलाकारांनी विविध प्रसिद्ध गाणी सादर केली, ज्यामुळे उपस्थितांना गुलजार यांचे गाण्यांची आठवण झाली.

कार्यक्रमात अनुप यादव यांनी रामाची तर नेहा यादव यांनी सीतेची भूमिका सादर केली. या दोन्ही भूमिकांनी रसिक श्रोतांचे मन जिंकले. डॉ. सिमला गजारलावार यांनी अब तो है तुमसे हर खुशी अपनी हे गीत सादर केले, तर प्रा. विजय बदखल आणि अन्य कलाकारांनी श्रोतांना मंत्रमुग्ध केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रकल्प निर्देशक मनीष बोराडे, अलका ठाकरे, मनीषा पडगिलवार, वृषाली डेकाटे, अनुप यादव, स्मिता जीवतोडे, संतोष तेलंग, सचिन गांगरेड्डेवार आणि डॉ. अशोक हासानी यांनी योगदान दिले. या दिवाळी पहाट कार्यक्रमाने उपस्थितांना आनंदित केले आणि दिवाळीच्या शुभेच्छांचा आदानप्रदान करण्यास उत्तम प्लेटफॉर्म उपलब्ध करून दिला.

# ग्राहकांनो सावधान! ऐन सणसुदीच्या काळात स्मार्ट बाजाराकडून ग्राहकांची लूट

**बदलापूर । प्रतिनिधी**
सणासुदीचा हंगाम सुरू असून, दिवाळीच्या काळात अनेक ग्राहक एकाच ठिकाणी सर्व वस्तू मिळण्याच्या सुविधेमुळे खरेदीस प्राधान्य देत आहेत. किराणा सामान, कपडे, आणि इलेक्ट्रॉनिक्सच्या खरेदीसाठी अनेकजण रिलायन्स स्मार्ट बाजाराकडे वळले आहेत. या स्मार्ट बाजारात जलद आणि सोयीस्कर खरेदी होत असली, तरी ग्राहकांनी सावधान राहणे आवश्यक आहे कारण येथे त्यांची फसवणूक होण्याची शक्यता आहे.




बदलापूरमध्ये भारत कॉलेज जवळील रिलायन्स स्मार्ट बाजारात अशाच प्रकारची एक घटना घडली आहे. या बाजारात वस्तूंच्या किमतीमध्ये फरक आढळून आला आहे. उदाहरणार्थ, एक किलो बटाट्याचे भाव ४८ रुपये म्हणून सूचना फलकावर लावण्यात आले होते, परंतु वजन केल्यावर त्याच बटाट्यांचे भाव ४९ रुपये प्रिंट करण्यात आले. काउंटरवर गेल्यावर या बटाट्यांना ५२ रुपये प्रति किलो असा बिलामध्ये दाखवण्यात आले. या बदलाबद्दल स्मार्ट बाजारातील कर्मचाऱ्यांना विचारले असता, त्यांनी उडवा-उडवीची उत्तरे देऊन 'ही किंमत वरून येते' असे उत्तर दिले.

यामुळे ग्राहकांची फसवणूक होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सूचना फलक, वजनमशीन, आणि काउंटरवरील किमती वेगवेगळ्या कशा असू शकतात, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. रिलायन्स स्मार्ट बाजाराच्या कर्मचाऱ्यांनी योग्य ती पावले उचलून ग्राहकांची फसवणूक होणार नाही याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

बदलापूर परिसरात गाव-गाड्यातून डिस्काउंट आणि बचतीच्या मोहाने खरेदीसाठी येणाऱ्या ग्राहकांना त्यांच्या खरेदीच्या पैशांचा हिशोब कसा ठेवावा लागेल, यावरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ग्राहकांनी अधिक सजग राहून खरेदी करणे आवश्यक आहे, अन्यथा त्यांची आर्थिक हानी होण्याची शक्यता आहे.

# किशोर जोरगेवार व डॉ. रमेशकुमार गजभे यांच्या प्रवेशाने भाजप संघटन मजबूत - हंसराज अहीर

**चंद्रपूर । प्रतिनिधी**
भारतीय जनता पार्टीमध्ये चंद्रपूरचे विद्यमान आमदार किशोर जोरगेवार आणि माजी राज्यमंत्री तथा माना समाजाचे नेते डॉ. रमेशकुमार गजभे यांची घरवापसी झाल्याने भाजपची राजकीय ताकद वाढली आहे. त्यांच्या पक्षप्रवेशामुळे चंद्रपूर जिल्ह्यात भाजपाला पुन्हा वैभव प्राप्त होईल, असा विश्वास माजी केंद्रीय गृहराज्यमंत्री हंसराज अहीर यांनी व्यक्त केला.




जोरगेवार व गजभे या लोकप्रिय नेत्यांच्या भाजप प्रवेशामुळे चंद्रपूर, वरोरा, चिमूरसह जिल्ह्यातील विविध विधानसभा क्षेत्रांत पक्षाला मोठा जनाधार मिळेल, असेही अहीर म्हणाले. या प्रवेशामुळे भाजपाचे संघटनात्मक सामर्थ्य वाढणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

किशोर जोरगेवार हे महायुतीचे चंद्रपूर विधानसभा क्षेत्रातील अधिकृत उमेदवार असल्याने अनुसूचित जाती वर्ग भाजपाच्या पाठीशी राहील, तर डॉ. गजभे यांच्या राजकीय अनुभवाचा आणि अनुसूचित जमातींतील प्रभावाचा पक्षाला निवडणुकीत मोठा लाभ होईल, असे हंसराज अहीर यांनी सांगितले. उभयतांचा सर्व समाजात असलेला प्रभाव भाजपाच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावेल, असा आशावादही त्यांनी व्यक्त केला.

अहीर यांनी जोरगेवार आणि गजभे यांच्या भाजप प्रवेशाचे स्वागत करताना पक्षाच्या भविष्यासाठी हा प्रवेश निर्णायक ठरेल, असे मत व्यक्त केले.

# निशांत दिवाळी अंकाचे प्रकाशन उत्साहात

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**
अनेकानेक प्रतिष्ठेचे पुरस्कार प्राप्त निशांत दिवाळी अंकाची २४ वी आवृत्ती वाचकांच्या भेटीसाठी उपलब्ध झाली असून, या वर्षी पहिल्यांदा राज्य पातळीवरील पुणे येथील बुक गंगा या ऑनलाईन पुस्तक विक्री करणार्या एजन्सीने पहिल्यांदाच अहिल्यानगरच्या दिवाळी अंकाचा मुखपृष्ठावर समावेश केल्याने हा नगरकरांचा बहुमान असल्याचे संपादक निशांत दातीर यांनी सांगितले.

यावर्षीच्या दिवाळी अव्हानाचा डोंगर... उपायांचा नांगर... या राजयकीय परिसंवादात जेष्ठ पत्रकार वासुदेव कुलकर्णी, जयदेव डोळे, प्रमोद मुजमदार, अनिकेत जोशी, भालचंद्र कानगो यांचे अभ्यासपूर्ण मत प्रदर्शित करण्यात आले आहे. उद्याच्या सदृढ सक्षम महाराष्ट्रसाठी या परिसंवादात नागरीक बँकांचा अस्तित्वाचा लढा, सहकारातले दुध का नासले, साखर उद्योग वाचविण्यासाठी या परिसंवादात जेष्ठ पत्रकार भागा वरखडे, बँकींग रंजित श्रीगोड, वसंतराव कवादे, कैलास ढोले, कृषीतज्ञ प्रा.अशोक ढगे आदींचे मत प्रदर्शित करण्यात आले आहे. मिशन २०४७ या विषयावर माहिती तंत्रज्ञान शैक्षणिक तज्ञ डॉ.दिपक शिक्रापुर, अजय वाळींबे, निवृत्त मेजर जनरल दत्तात्रय शेकटकर, मुंकूद गायकवाड, अनंत सरदेशमुख, विवेक वेलनकर, असिम सरोदे, प्रविण दिक्षित आदी मान्यवरांचे लेख आहे.

## निवडणुकीनंतर फडणवीस अन् ठाकरे एकत्र येणार?

# रामदास आठवले यांचा दावा, जागा न मिळाल्याने व्यक्त केली नाराजी



**मुंबई (वृत्तसंस्था)**

विधानसभा निवडणुकीनंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची भेट होऊ शकते, असा दावा केंद्रीय मंत्री आणि रिपाइंचे अध्यक्ष रामदास आठवले यांनी केला आहे. महायुतीच्या जागावाटपात मित्र पक्ष असलेल्या रिपाइं पक्षाच्या वाट्याला जागा न आल्याने रामदास आठवले नाराज झाले आहेत. त्यांनी आज पत्रकार परिषद घेऊन आपली नाराजी उघडपणे बोलून दाखवली. यासोबतच आठवले यांनी उद्धव ठाकरे यांना महायुतीसोबत येण्याची ऑफरही दिली आहे.

रामदास आठवले म्हणाले की, 'मी आणि माझ्या पक्षातील अनेक कार्यकर्ते नाराज आहेत, आमचा पक्ष छोटा जरी असला तरी जागा हव्या होत्या. मागे फडणवीसांना पत्र लिहून किमान ५ जागा देण्याची मागणी केली होती. मात्र, जागा मिळाल्या नाहीत. त्यामुळे उमदेवारी अर्ज दाखल करण्यासाठी जाणार नसल्याचे कार्यकर्ते म्हणत आहेत.रामदास आठवले म्हणाले की, २०१२ मध्ये भाजपसोबत आलो. आज आरपीआय कुठेच दिसत नाही. मी त्यांच्याकडे नाराजी व्यक्त केली आहे. धारावी किंवा चेंबूरच्या जागेसाठी आम्ही आग्रही होतो. महामंडळाची देखील मागणी केली आहे. जिल्हा परिषद, महापालिकेसंदर्भात देखील चर्चा झाली आहे. आरपीआयला डावलून चालणार नाही. आम्हाला सत्तेत वाटा मिळाला पाहिजे. मी महायुतीच्या बाजूने आहे. मी केंद्रात मंत्री असल्याने इतर राज्यात देखील पक्षाच्या जागा वाढवतो, त्यामुळे आम्हाला जागा मिळाल्या पाहिजेत, असे आठवले म्हणाले.रामदास आठवले यांनी काँग्रेसवर हल्लाबोल केला. काँग्रेस पक्ष उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला मजबूत करण्याऐवजी खिळाखिळा करत आहे, असे ते म्हणाले. उद्धव ठाकरे यांनी महायुतीकडे परत यावे, अशी ऑफर ठाकरेंना दिली. उद्धव ठाकरे हे महायुती सोबत राहिले असते तर एकनाथ शिंदे फुटलेच नसते, असा दावा त्यांनी केला. देवेंद्र फडणवीस आणि उद्धव ठाकरे यांची भेट निवडणुकीनंतर होऊ शकते, असेही आठवले यांनी म्हटले आहे.

# घनसावंगी विधानसभा मतदार संघात दिग्गजामध्ये चुरशीची लढत

## निवडणूकीचे चित्र ४ नोव्हेंबरला स्पष्ट होणार

**जालना । प्रतिनिधी**

घनसावंगी विधानसभा मतदार संघात ५७ उमेदवारांनी ८४ नामनिर्देशन पत्र दाखल केले असून सध्या तरी या मतदार संघात अनेक दिग्गज उमेदवार निवडणूक रिंगणात उतरले असल्याने घनसावंगीमध्ये बहुरंगी निवडणूक लढत होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. मात्र निवडणूकीचे चित्र ४ नोव्हेंबर रोजी स्पष्ट होण्याची शक्यता आहे.



घनसावंगी विधानसभा निवडणूकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाकडून माजी आरोग्य मंत्री विद्यमान आमदार राजेश टोपे, शिवसेना शिंदे गटाकडून डॉ हिकमत उढाण, माजी आमदार विलासराव खरात, माजी आमदार शिवाजीराव चोथे, सतिश घाटगे, पंडितराव भुतेकर आदींनी नामनिर्देशन पत्र दाखल केल्याने विधानसभा निवडणूक चुरशीची होण्याची चर्चा आहे. या मतदार संघात ५७ उमेदवारांनी ८४ नामनिर्देशन पत्र दाखल केल्याने बहुरंगी लढत होण्याची शक्यता असली तरी निवडणूकीचे चित्र नामनिर्देशन पत्र मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी ४ नोव्हेंबर रोजी स्पष्ट होणार आहे.

२०१९ च्या विधानसभा निवडणूकीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राजेश टोपे व शिवसेनेचे डॉ हिकमत उढाण यांच्यात सरळ व काट्याची लढत होऊन राजेश टोपे विजयी झाले होते. परंतु या वेळेस अनेक दिग्गज निवडणूक रिंगणात उतरले असून ही निवडणूक चुरशीची होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. किती उमेदवार निवडणूकीतून माघार घेणार आणि कोणते उमेदवार निवडणूक रिंगणात राहणार हे ४ नोहेंबर रोजी स्पष्ट होणार असून पुढच्या आठवड्यात राजकिय वातावरण तापण्याची शक्यता आहे.

## घनसावंगी विधानसभा मतदार संघात ८४ पैकी १२ नामनिर्देशन पत्र अवैध



**जालना । प्रतिनिधी**

१०० घनसावंगी विधानसभा मतदार संघातून विधानसभा निवडणूकीसाठी दि. ३० ऑक्टोबर २०२४ रोजी नामनिर्देशन पत्राची छाननी उमेदवार व उमेदवारांचे प्रतिनिधी यांच्या उपस्थितित करण्यात आली. त्यामध्ये कठाळू (बापू) तुकाराम दशरथ, सचिन लक्ष्मण खरात यांचा नामनिर्देशन पत्र शपथपत्र अपूर्ण असल्यामुळे आणि मनिषाताई राजेशभैया टोपे यांचा नामनिर्देशन पत्र पक्षाचा ए.बी. फॉर्म नसल्यामुळे अवैध ठरविण्यात आला आहे. घनसावंगी विधानसभा निवडणूकीसाठी दि. २९ ऑक्टोबर २०२४ रोजी एकूण ८४ नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले होते. त्यामध्ये १२ नामनिर्देशन पत्र अवैध ठरले असून ७२ नामनिर्देशन पत्र वैध आहेत. सदरील छाननी प्रक्रियेसाठी निवडणूक निर्णय अधिकारी मनिषा दांडगे, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी योगिता खटावकर, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी विजय चव्हाण, नायब तहसीलदार मोनाली सोनवणे, नायब तहसीलदार संतोष इथापे, कैलास आरगडे, विलास मुळक, विजय पाटील, पी.यू. आवटे, बी.एस. पवार, वाय.बी. सानप, जी.बी. हुलमूख यांनी कामकाज पाहिले.

# जोरदार शक्तिप्रदर्शन करत आमदार सतीश चव्हाण यांचा उमेदवारी अर्ज दाखल



**गंगापूर । प्रतिनिधी**

गंगापूर विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीच्या वतीने राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष-शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार आमदार सतीश चव्हाण यांनी आज (दि. २८) जोरदार शक्तिप्रदर्शन करत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या प्रक्रियेला प्रारंभ गंगापूर शहरातील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करुन करण्यात आला. या रॅलीत गंगापूर व खुलताबाद तालुक्यातील महाविकास आघाडीचे पदाधिकारी, असंख्य कार्यकर्ते, सामान्य नागरिक व महिलांचा उत्स्फूर्त सहभाग होता. शिस्तबद्ध आणि शांततेत निघालेल्या या रॅलीत आमदार चव्हाण यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज यांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

रॅली दरम्यान जवळपास पाच-सहा किलोमीटर गंगापूर शहरातील मुख्य रस्त्यावर मोठी गर्दी होती. उमेदवारी अर्ज भरण्यासाठी केलेले हे शक्तिप्रदर्शन पाहून प्रत्यक्ष दर्शकांना गंगापूर मतदारसंघात परिवर्तन अटळ आहे, अशी चर्चा स्पष्टपणे जाणवत होती. या वेळी प्रथमच इतकी मोठी गर्दी जमा झाल्याने आमदार चव्हाण यांच्यासाठी वातावरण अत्यंत आश्वासक ठरत आहे. या गर्दीने विरोधकांसमोर मोठे आव्हान निर्माण केले असल्याचे दिसून येत आहे. राष्ट्रवादी, शिवसेना आणि काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने रॅलीत सहभाग घेतला. रॅली पाहण्यासाठी गंगापूर शहरातील नागरिकांनी रस्त्यावर मोठी गर्दी केली होती.याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी मंत्री राजेश टोपे, ज्येष्ठ नेते सुधाकर सोनवणे, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते जगन्नाथ खोसरे, उपजिल्हा प्रमुख लक्ष्मणभाऊ सांगळे, त्रिंबक तुपे, डॉ. नरेंद्र काळे, पांडुरंग तांगडे पाटील, संजय जाधव, राजू वरकड, दिनेश मुथा, अंकुश काळवणे, अनिल चव्हाण, संपत छाजेड, अनिल जाधव, संजय जैस्वाल, विश्वजीत चव्हाण, आयुब पटेल, जनार्धन रोडगे, महेश उबाळे, रमेश निचित, अर्चना सोमासे, मच्छिंद्र देवकर, राजू पाटील डोणगावकर, मोहसीन चाऊस, एस एस खमर, नासेर पटेल, रावसाहेब तोगे, प्रवीण नीतनवरे, नितीन कांगुने, मारोती साळवे, लक्ष्मण पाटील प्रधान, अशोक गायकवाड, राजू पठाण, अनिता बोरसे, गजानन फुलारे, विमलबाई जगताप, योगेश पाटील, सुरेश नेमाडे, आयुब पटेल, तुकाराम सटाले, सोपान देशमुख, नदीम शेख, वाजेद शेख यांच्यासह राष्ट्रवादी, शिवसेना, काँग्रेस व महाविकास आघाडीतील मित्र पक्षाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# मुंबईत असुन देखील गांवाशी नाळ जोडलेली आहे

## त्याबद्दल तुमचे कौतुक-माजी आ.भीमराव धोंडे






**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी पाटोदा शिरूर हे तालुके कायमस्वरूपी दुष्काळी आहेत त्यामुळे या भागातील लोक शहराकडे मोठ्या प्रमाणात स्थलांतरित होतात,शहरात येऊन स्थायिक झाले तरी आपण आपल्या गांवाशी नाळ जोडलेली आहे हि बाब तुमच्या दृष्टीने अतिशय कौतुकास्पद आहे असे प्रतिपादन माजी आमदार भीमराव धोंडे यांनी केले.

याबाबत अधिक माहिती अशी की,मुंबई,पनवेल परिसरात विविध व्यवसाय आणि काम धंद्याच्या तसेच नौकरीच्या निमित्ताने रहात असलेल्या आष्टी पाटोदा शिरूर तालुक्यातील मायबाप जनतेशी संवाद साधण्यासाठी रविवारी माजी आ. भीमराव धोंडे यांच्या नेतृत्वाखाली नविन पनवेल येथे स्नेह मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निवृती गर्जे हे होते.यावेळी व्यासपीठावर नगरसेवक काकासाहेब कुत्तरवडे,राजेंद्र वनवे,बबनराव बारगजे,मच्छिंद्र झगडे,भारत गर्जे,सरपंच सुरेश गोल्हार,माजी सरपंच बाळासाहेब पवार,गोपिनाथ मुंडे,सरपंच अभय गर्जे,सरपंच ज्ञानेश्वर वाघ,हरिदास वनवे, विकी शेकडे,संतोष आमले, सुभाष आंधळे,सुधाकर गर्जे,संदीप गर्जे,आदेश निमोणकर व इतरांची उपस्थिती होती.पुढे बोलताना माजी आ. भीमराव धोंडे यांनी सांगितले की, आपला मतदारसंघ दुष्काळी आहे.त्यामुळे आपल्या भागातील हजारो लोक मुंबई,पनवेल,पुणे, सुरत,संभाजीनगर अशा मोठ्या शहरात काम धंद्याच्या निमित्ताने स्थलांतरित होतात.परंतु त्यांनी आपल्या गावाशी नाळ तोडलेली नाही हे अत्यंत महत्त्वाचे आहे. मी सर्व जातीं धर्माच्या लोकांसाठी काम करतो, मी कधीही जातीभेद केला नाही. आपल्या संस्थेत सर्व जाती धर्माचे लोक नोकरी करतात. मतदारसंघातील लोकांच्या आग्रहास्तव निवडणुक लढवत आहे.आपल्या भागातुन खेड्यापाड्यातील लोक इकडे येऊन ३० ते ४० कंटेनरचे मालक झालेत आणि त्यांचा वाहतुकीचा मोठा व्यवसाय यांचा मला खुप अभिमान वाटतो. काहीजण उच्चशिक्षित आहेत ते नोकरी करतात.काही तर अशिक्षित असुन सुद्धा इकडे येऊन जागा घेऊन त्यांनी घरे बांधली आहेत खरोखरच त्यांनी कष्टातून चांगली प्रगती केली आहे. लोकसभा निवडणुकीच्यावेळी एकदा स्व.गोपीनाथराव मुंडे उमेदवार होते.मतदारसंघातील फक्त मीच त्यांच्या सोबत होतो. मुंडे साहेबांचा वारसा आ. पंकजाताई यांनी चालवला आहे. लोकसभेला आ.पंकजाताई मुंडे यांचा झालेल्या पराभवाची सल मनात आहे.त्यांच्या विजयासाठी मी खुप प्रयत्न केला. मतदारसंघाच्या विकासासाठी संपूर्ण मतदारसंघाचा दौरा केला आहे.मी विधानसभा निवडणुक लढविण्यासाठी अपक्ष उमेदवारी दाखल केली आणि मी निवडणुक लढवणारच आहे. गहिनीनाथ गड आणि विठ्ठल महाराज यांच्याशी माझं अतूट नातं आहे मी प्रत्येक वर्षी दिंडीत सहभागी होत असतो.अजुनही मतदारसंघातील बरेच गोरगरिब ऊसतोडणीसाठी जातात त्यांची ऊसतोड कायमची बंद करण्यासाठी प्रयत्न करणार आहे.तुम्ही कुठल्याच बाबतीत घाबरु नका मी तुमच्या सोबत आहे.यावेळी आष्टी पाटोदा शिरूर तालुक्याच्या वतीने माजी आमदार भीमराव धोंडे यांचा सत्कार करण्यात आला. युवा नेते अजयदादा धोंडे यांनी सांगितले की,आ.पंकजाताई मुंडे यांची मनापासून इच्छा होती की धोंडे साहेबांना उमेदवारी मिळावी.उमेदवारी मिळाली नाही तरी आपण सर्व ताकदीनिशी निवडणुकीला सामोरे जाणार आहोत.मुंबई व परिसरात रहात असलेल्या सर्वांनी मतदानाला येऊन साहेबांना सहकार्य करावे. लोकसभा मतमोजणीप्रसंगी आ. पंकजाताई ताई सोबत पालकमंत्री धनंजय मुंडे, वाल्मिक कराड आणि धोंडेसाहेबच होते.याप्रसंगी नगरसेवक काकासाहेब कुत्तरवडे,सरपंच सुरेश गोल्हार,भारत गर्जे,गोपिनाथ मुंडे व इतरांची भाषणे झाली. सुत्रसंचलन महारुद्र खेडकर यांनी केले.कार्यक्रमास पनवेल, मुंबई परिसरातील नागरिक उपस्थित होते.